| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ६६ वा | मंगळवार, दिनांक २६ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

लातूर समाचार
रोज वाचा
ऑनलाईन
www.
latursamachar.
com
वर..

## प्रभात किरणे

आपणास वाटते,
सारे आपलेच असतात..
जीवाभावाचे,रक्ताचे,
मैत्रीचे, विश्वासाचे ...
आपल्यासाठी त्यांच्याकडे
वेळ कुठे असतो ....
यातून जो बाहेर पडे,
तोच प्रगती करतो .....
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## मुकूटमणी

विलासराव आपल्या
जुळून येतीआठवणी
चटकदार हवीहवीशी
लोणच्याची ती बरणी

मौल्यवान शोभे हिरा
बाभळगांवचे कोंदणी
सर पंच ते मुख्य मंत्री
लुभावते शुक्र चांदणी

सुसंपन्न समृध्दअसून
नेहमीचं साधी राहणी
सांस्कृतिकसाहित्यिक
भक्कम पाया भरणी

अंतर्बाह्य स्वच्छ सारे
छबी दिसे ती देखणी
करारी कडक धोरणी
पण तितुकी मृदूवाणी

फळगोड चाखेआम्ही
केलेली आपण पेरणी
योग्यवेळी किटकावर
समर्थ सार्थ फवारणी

तळा गाळा धाव घेतो
हुंकारजरी देता कुणी
म्हणूनचं बळीराजाचा
शोभतो हा मुकूटमणी

आगळे वेगळेचं गोड
मांजराई सरिता पाणी
फिटणार ना उपकार
सदैव सारे राहू ऋणी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## कुजबुज

**-डॉ. संजय जमदाडे**



**राज्यात अनेक भागात मान्सून पूर्व सरी...**

## चिमटा

दयाचा



शिक्षणाबाबत लातूरला बदनाम केली जात आहे!
ट्युशन, क्लासेच्या पुर्वही विद्यार्थीनी लातूरचे नाव गाजविले आहे !!
एवढे मात्र नक्की की शिक्षणाचा बाजार थांबणार आहे !!!

# श्री सिद्धिविनायक मंदिर सुशोभीकरण प्रकल्पामुळे परिसराला मिळणार नवे रूप - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई, दि.२५ : श्री सिद्धिविनायक मंदिरात देश विदेशातून भाविक येत असतात. भाविकांना सुलभ व कमी वेळामध्ये सिद्धिविनायकाचे दर्शन झाले पाहिजे. मंदिर परिसरात पायाभूत सुविधांची कामे करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून मंदिर परिसराचे सुशोभीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वामुळे श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराला नवे रूप मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या सुशोभीकरण पहिल्या टप्प्यातील कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजन नंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, श्री सिद्धीविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) सदानंद शंकर सरवणकर, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार प्रसाद लाड, महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, तसेच सिद्धीविनायक मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांच्यासह न्यासाचे विश्वस्त उपस्थित होते.

सुशोभीकरण प्रकल्पामुळे दररोज दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक चांगल्या सुविधा आणि प्रसन्न वातावरण मिळणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. मुंबई, दि.२५ : श्री सिद्धिविनायक मंदिरात देश विदेशातून भाविक येत असतात. भाविकांना सुलभ व कमी वेळामध्ये सिद्धिविनायकाचे दर्शन झाले पाहिजे. मंदिर परिसरात पायाभूत सुविधांची कामे करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून मंदिर परिसराचे सुशोभीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वामुळे श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराला नवे रूप मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या सुशोभीकरण पहिल्या टप्प्यातील कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजन नंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, श्री सिद्धीविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) सदानंद शंकर सरवणकर, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार प्रसाद लाड, महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, तसेच सिद्धीविनायक मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांच्यासह न्यासाचे विश्वस्त उपस्थित होते.

सुशोभीकरण प्रकल्पामुळे दररोज दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक चांगल्या सुविधा आणि प्रसन्न वातावरण मिळणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. मुंबई, दि.२५ : श्री सिद्धिविनायक मंदिरात देश विदेशातून भाविक येत असतात. भाविकांना सुलभ व कमी वेळामध्ये सिद्धिविनायकाचे दर्शन झाले पाहिजे. मंदिर परिसरात पायाभूत सुविधांची कामे करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून मंदिर परिसराचे सुशोभीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वामुळे श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराला नवे रूप मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या सुशोभीकरण पहिल्या टप्प्यातील कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजन नंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, श्री सिद्धीविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) सदानंद शंकर सरवणकर, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार प्रसाद लाड, महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, तसेच सिद्धीविनायक मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांच्यासह न्यासाचे विश्वस्त उपस्थित होते.

सुशोभीकरण प्रकल्पामुळे दररोज दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक चांगल्या सुविधा आणि प्रसन्न वातावरण मिळणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

# रेणा प्रकल्पातून राजरोस अवैध गाळ उपसा

## कारवाई एका वाहनावरच, पाटबंधारे विभागाने पत्र देऊनही प्रादेशिक परिवहन अधिकारी विभागाचे कारवाईकडे दुर्लक्ष

**लातूर/प्रतिनिधी:** तालुक्यातील भंडारवाडी येथील रेणा मध्यम प्रकल्पातून सद्या शेकडो वाहनातून अवैध रित्या गाळ उपसा सुरु असताना केवळ एकाच वाहनावर कारवाई करण्यात आली. एकाच कारवाई दाखवून वाळू माफियांना मोकाट सोडण्यात येत असल्याने नागरिकातून संताप व्यक्त होत आहे.

रेणापूर तालुक्यातील भंडारवाडी येथील रेणा मध्यम प्रकल्पातून मोठ्या प्रमाणावर गेल्या १५ ते २० दिवसापासून विनापरवाना गाळ उपसा सुरु असून या प्रकरणी अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्यासाठी पाटबंधारे विभागाने प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) लातूर यांना पत्र पाठवून कारवाईची मागणी केली आहे. मात्र केवळ एका वाहनांवर अवैध रित्या गाळ उपसा करणाऱ्या टिप्पर वर कारवाई करण्यात आली आहे. रेणा मध्यम प्रकल्पातून दिवसरात्र सुरु असलेल्या शेकडो वाहनांनी क्षमतेपेक्षा अधिक गाळ वाहुन नेणाऱ्या वाहनांमुळे नागरिकाने धुळीने आरोग्य धोक्यात आले आहे.

प्रशासनाची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता केवळ आर्थिक फायद्यासाठी हा अवैध गाळ उपसा सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.या अवैध वाहतुकीमुळे पानगाव व परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. तळेगाव-पानगाव मार्गावर सतत उडणाऱ्या धुरळ्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून वाहनचालकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.तसेच या वाहनांमुळे रस्त्यालगत असलेल्या हॉटेल,किराणा दुकान फळांची गाडे यावर मोठ्या प्रमाणात धुळ साचत आहे. पानगाव शाखा कार्यालयाने याबाबतचा अहवाल उपविभागीय कार्यालयाकडे पाठवल्यानंतर उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग क्रमांक ७, लातूर यांनी आरटीओ कार्यालयाशी पत्रव्यवहार करून भरारी पथकाद्वारे अचानक तपासणी करण्याची मागणी केली होती. विनापरवाना आणि अवैधपणे धावणाऱ्या केवळ एका वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.परंतू दिवसा ढवळ्या शेकडो वाहने आजही अवैध रित्या गाळ उपसा करुन वाहतूक सुरुच आहे.केवळ एका वाहनांवर कारवाई करुन भागेल का असाही सवाल नागरिकातून उपस्थित केला जात आहे.

# पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत

**लातूर/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागावी व शाळेविषयी आस्था निर्माण व्हावी म्हणून शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे शाळेत प्रभावी स्वागत व प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये इयत्ता पहिली ते बारावीतील सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सवाच्या प्रसंगी जोरदार स्वागत करण्यात येणार आहे. यासंदर्भात, शासनाने शाळा प्रवेशोत्सव आयोजनाबाबत परिपत्रक जारी केले आहे. शाळा प्रवेशोत्सवाची माहिती स्कूल पोर्टलवर नोंदविण्यासही सांगण्यात आले आहे. शाळा परिसरातील वयोगट सहा ते १४ वर्षांच्या सर्व मुलांचे प्रवेश झाले का? याची खात्री करण्यास शिक्षकांना सूचित केले असून, शाळाबाह्य झालेली किंवा असलेल्या बालकांचा शोध शाळापूर्व तयारीच्या कालावधीत घेण्यात येणार आहे.

शोधून काढलेल्या मुलांना शाळेत प्रवेश देण्याची तयारी शिक्षकांना करावी लागणार आहे. नजीकच्या परिसरातील दगडखानी, वीटभट्टी, बांधकामाचे ठिकाण, उद्याने, बाजारपेठा, पदपथ, सिग्नल, कुटीर उद्योग, कामगार वस्त्या यासारख्या ठिकाणांचे सर्वेक्षण करून तेथे मुले आढळल्यास त्यांना शाळेत आणण्याचे कष्ट शिक्षकांना घ्यावे लागणार आहेत.

# प्रशासकाला खर्चाचे अधिकार नसल्याने गावगाडा ठप्प

## निलंगा तालुक्यातील ४८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका प्रलंबित

**निलंगा/मोईज सितारी:** निलंगा तालुक्यातील तब्बल ४८. ग्रामपंचायतींच्या निवडणुका प्रलंबित असून, संबंधित ग्रामपंचावतीवर सध्या प्रशासक नियुक्त करण्यात आले आहेत. मात्र, प्रशासकांना आर्थिक खर्चाचे अधिकार नसल्याने गावपातळीवरील विकासकामे व वैनदिन कारभार पूर्णपणे ठाम इशल्याचे चित्र निर्माण झाले आहे. निलंगा तालुक्यातील ४८ ग्रामपंचायतची जानेवारी २०२६ मध्ये मुदत संपली, मुपतीत ग्रामपंचायतच्या निवडणूका झाल्या नसल्याने त्या ग्रामपंचायतवर सरपंचालाच प्रशासक माणून राज्य सरकारने नियुक्ती दिली. मात्र कोटीन प्रशासकाला केवळ किरकोळ बाबीवर खर्च करण्याचे अधिकार दिल्याने ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणारी पाणीपुरवठा, अत्यावश्यक कामे निधीअभावी स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, बीज, कर्मचारी मानधन यांसारखी नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी रखडली आहेत. अनेक गावांमध्ये

प्राप्त सहन करावा लागत असून, ग्रामस्थांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. प्रशासकांकडे केवळ कागदोपत्री जबाबदारी असून प्रत्यक्ष खर्च करण्याचे अधिकार नसल्याने कोणतेही विकासकाम हाती घेणे शक्य होत नाही. परिणामी ग्रामपंचायतींचा दैनदिन कारभार केवळे नावापुरता सुरु असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाकडून प्रलंबित ग्रामपंचायत निवडणुकांचाबत अद्याप स्पष्टता नसल्याने प्रशासन आणि ग्रामस्थ दोघेही संभ्रमात आहेत. दि. ४ में रोजी अंतिम प्रभाग रचना नाहीर करण्यात आली. त्यानंतर प्रागपंचानत निवडणुकीच्या संदर्भात कोणल्याही हालचाली निवडणूक आयोग करताना दिसून येत नाही, निवडणुका लवकर जाहीर करून लोकप्रतिनिधी निवडून द्यावेत तसेच तोपर्यंत प्रशासकांना आवश्यक आर्थिक अधिकार द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थ व सामाजिक कार्यकत्यांकडून होत आहे.

# तक्रार दिली म्हणून मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

उदगीर/प्रतिनिधी : तुम्ही आमच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार का दिली, असे म्हणून आरोपींनी संगणमत करून फिर्यादी व फिर्यादीच्या सासूला शिवीगाळ करीत मारहाण करून जखमी केले आहे. याप्रकरणी तिघांविरुद्ध उदगीर शहर पोलिसात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत फिर्यादी रेशमा शाम कसबे (रा. गांधीनगर, उदगीर) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी कृष्णा शरद कांबळे, सुमन शरद कांबळे, रेणुका सुदाम कांबळे (सर्व रा. गांधीनगर उदगीर) यांनी संगणमत करून तुम्ही आमच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार का दिली, असे म्हणून फिर्यादी व फिर्यादीच्या सासूला शिवीगाळ केली. तसेच कुर्हाडीच्या दांडयाने फिर्यादीच्या डोक्यात मारून जखमी केले.

फिर्यादीचे सासुस लाथाबुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली अशी तक्रार दाखल केली आहे. त्यावरून आरोपीविरुद्ध गुरनं. १९३/२६ कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), (३), ३ (५) बीएनएस प्रमाणे गुन्हा झाला आहे.

# प्राथमिक शाळांना पाच दिवसांचा आठवडा करावा

**लातूर/प्रतिनिधी:**

राज्यातील प्राथमिक शाळांना पाच दिवसांचा आठवडा लागू करावा, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून होत आहे. प्रशासकीय कामकाजाचा पाच दिवसांचा आठवडा केला. परंतु, शाळा, महाविद्यालयांना कामकाजाचे सहा दिवस ठेवले आहेत. केंद्र सरकारच्या विविध विभागांना पूर्वीपासूनच पाच दिवसांचा आठवडा लागू आहे. प्राथमिक शाळांनाही प्रशासकीय कार्यालयाप्रमाणे पाच दिवसांचा आठवडा करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

विविध शिक्षणतज्ज्ञ, बालमानसशास्त्रज्ञ, मानसोपचारतज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातील बोजा आणि पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुचवल्या आहेत. सततच्या अभ्यासाचा ताण आणि दप्तराच्या ओझ्याने मुलांचे बालपण कोमेजून जात आहे.

शिक्षणातील वाढत्या स्पधात्माक राणावाने अनेक विद्यार्थी टोकाचे पाऊल उचलत आहेत. अनेक पालकांना शनिवार, रविवार सुट्टी असते. शिक्षकांवर शाळेच्या नियमित अध्यापनाबरोबरच बीएलओ, जनगणना, विविध ऑनलाईन कामे आणि इतर शासकीय कामे सोपवली गावातही बहुतांश कामे शाळेच्या वेळेनंतर तसेच शनिवार, रविचारी करावी लागतांत, नवीन मतदार नोंदणी कैम्प, मतदान वाद्यांची कामे व विविध प्रशिक्षणे शनिवार-रविवार आयोजिली जातात. शनिवारी विद्याथ्यांना अर्धा दिवस सुट्टी असते, या अध्यों दिवसाऐवजी पूर्ण सुट्टी मिळाल्यास शिक्षक व. विद्यार्थी दोघांच्याही शारीरिक, मानसिक आरोग्यासाठी उत्तम ठरेल. बालकांचे बालपण हरवणार नाही. अभ्यासाचा ताण कमी होईल आणि पालकांसोबतचे कौटुंबिक संबंध सुधारतील, अशी शिक्षकांची भूमिका आहे.

तुमची KYC अद्ययावत ठेवा
ज्यामुळे तुमच्या बँकिंग सेवा चालू राहतील



जर तुमचा KYC तपशील बदलला नसेल तर,
पत्र/ऑनलाइन बँकिंग/मोबाइल बँकिंग/एटीएम/तुमच्या बँक किंवा बिझनेस करस्पाँड्ट्सकडे (बीसीज) रजिस्टर असलेल्या तुमच्या मोबाइल नंबर/ईमेलद्वारे Re-KYC साठी स्व-घोषणा सादर करा.

जर तुमचा KYC तपशील बदलला असेल तर,
अपडेटची माहिती देणाऱ्या कोणत्याही कागदपत्राची एक प्रत द्या: आधार/मतदाता ओळखपत्र/NREGA जॉब कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट/नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टरने जारी केलेलं पत्र.

आपल्या बँकेच्या जवळच्या शाखेत जाऊनही KYC अपडेट करू शकता.




अधिक माहितीसाठी, https://rbikehtahai.rbi.org.in/KYC वर जा
अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप नंबर्स: 99990 41935/99309 91935

सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अखंड स्मरणातील विलासराव देशमुख

लातूरचे भाग्यविधाते व देशपातळीवरील नेते दिवंगत विलासराव देशमुख यांना कोणी ओळखत नाही असे नाही. त्यांची ओळखच त्यांच्या कामाची हातोटी होती. कोणाचेही काम असो ते पुर्ण करण्याची शैली होती. तो कोणत्या पक्षाचा आहे किंवा कोणत्या जाती-धर्माचा आहे याचे देणे-घेणे नव्हते तर त्याचे काम झाले पाहिजे. जो आडचणी असतो तोच कामासाठी येत असतो. त्यामुळे त्याला नाराज करणे कदापी त्यांच्याकडून झाले नाही. आजही लातूरची जनता त्यांना दैवत मानते कारण ते काम करणारी व्यक्ती होती. जनतेला नेता कसा हवा असतो तर काम करणारा, राज्यात व देशात काम न करणारी मंडळी बरीच सापडतील त्यांचे नामोनिशान मिटले आहे. तसे विलासराव देशमुख यांचे नाही. वडीलांचे निधन झाले, तसेच अंगावर सोवळेवस्त्र परिधान करून सोलापूर दंगलग्रस्त भागात भेट दिली. कधी वेळ किंवा काळ पाहिला नाही तसत घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे जनतेची कामे करीत राहाणे हा त्यांचा हातखंड होता. म्हणून जनतेच्या गळ्यातील ताईत होते असे म्हटले तर चुकीचे ठरू नये. त्यांना कामची आवड होती. कोणाचेही काम झाले पाहिजे ना-चा पाडा जवळच नव्हता, त्यामुळे असंख्य कामे केली व लोखोंचा जनसमुदाय जोडला गेला. देशातील नंबरवनचे नेते बनत असताना काळाने हिरावुन घेतले. ज्यावेळी दिल्लीत जेष्ठ समाजसेवक अण्णा हाजारे हे उपोषणास बसले. देश घाबरला, आता अण्णाचे उपोषण माघार घेण्यासाठी तसा प्रयत्न करणारा नेता कोण आहे. त्यावेळी काँग्रेसचे सरकार केंद्रात होते तेही घाबरलेल्या आवस्थेत असताना श्रीमती सोनिया गांधी ही जबाबदारी विलासराव देशमुख यांच्यावर टाकली ती यशस्वी पार पाडली. केंद्रात मोठी प्रशांसा झाली. डॉ. मनमोहनसिंग यांच्यानंतर कोणाला पंतप्रधान करावे ही समस्या सुटल्याची चर्चा होत असताना, विलासराव देशमुख यांची प्रकृतीने साथ दिली नाही. केद्रातील डॉ. मनमोहनसिंग यांचे सरकार वाचविण्याचे काम विलासराव देशमुख यांनी अनेकदा केले हे सत्य अजूनही बाहेर आले नाही. ठराविकांना ते माहिती आहे. लातूर जिल्ह्याचा विकास त्यांनी केला इतर कोणत्याही नेत्यांनी म्हणावा तसा केला नाही कारण त्यांना विकासाबात दुरदृष्टी होती, म्हणून लातूर जिल्ह्याचा विकास साधला. केवळ लातूरचा विकास साधत त्यांनी राज्याचा विकास साधला. अनेक राज्यासाठी निर्णय घेतले ते सार्थक ठरले आहेत. राज्याचा समतोल विकास साधत आपल्या मतदार संघाचा विकास कसा साधायाचा हे त्यांना चांगलेच ठावुक होते. त्यांनी देश पातळीवर अभ्यास करीत असताना आपल्या मतदार संघाचा विचार करून शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान सुधारण्यासाठी साखर कारखान्याची निर्मिती केली. वास्तविक लातूर विभागात साखर कारखाने नव्हते असे नव्हते, ढोकी व किल्लारीचा साखर कारखाना होताच मात्र पश्चिम महाराष्ट्राच्या तोडीस सहकार चळवळ यशस्वी करण्याचा पहिला प्रयोगासाठी मांजरा साखर कारखान्याची उभारणी करून ते यात यशस्वी झाले. मुळात राज्यात प. महाराष्ट्र हा सहकारी तत्त्वावर साखर कारखाना यशस्वी काम करीत आहे. मराठवाड्यात सहकारी तत्त्वावर अनेक सेक्टर यशस्वी करून दाखविले. नांदेड असो धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बँका डबघाईला आल्या मात्र लातूरची डीसीसी बँक नंबर एक वर आणली. ज्यांना विकासाची दुरदृष्टी असते ते अयशस्वी होत नसतात. राज्यात एकमेव असे नेते होवून केले त्यांचे शत्रुच निर्माण झाले नाहीत. ते आज जीवंत असते तर राज्यात काँग्रेसची सत्ता आणली असती मात्र काळाने झडप घातली व विकास हरवला गेला तो आज पर्यंत सापडला नाही. आम्ही शोधत आहोत. अनेकांच्या रूपात शोधत आहोत. परंतु सापडत नाही. अजूनही काही कार्यकर्ते त्यांच्यासारखे काम करण्याचा प्रयत्न करीत आहेत मात्र त्यांना यश आले नाही. त्यांच्यासारखी केसाची व ॲक्शन करण्याचा प्रयत्न करतात मात्र त्यांच्यासारखी सर येत नाही हे कोठेतरी नमुद करावे वाटते. ज्यांना अंत:करणातून विकासाची तळमळ असावयास पाहिजे. जनतेविषयी तळमळ मनापासून असावयास पाहिजे ते एकमेव नेते विलासराव देशमुख होते. आज आपल्यात नाहीत मात्र त्यांची आठवण कदापी विसराता येत नाहीत. सतत तुलनात्मक बाबी समोर येतात, त्यावेळी विलासराव देशमुख यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. त्यामुळे सतत स्मरणातील नेते आहेत हे लक्षात येते. विकासाचा केंद्र बिंदु हा जनसामान्यच मानला पाहिजे तेच विलासराव देखमुख यांनी शिकविले आहे. सामान्यातील सामान्य गोरगरीब, सामान्य शेतकरी हा त्यांनी केंद्रबिंदु माणून विकास साधला. ईश्वरीय लीला मोठी असते. सर्वांना गोरगरीब व सामान्यांची सेवा करण्याची दैवी शक्ती दिलेली असते, त्यातील एक आमचे सर्वांचे विलासराव देशमुख होते. त्यांच्यात दैवी शक्ती होती. त्यामुळे आजही त्यांचा परिवाराकडून काही प्रमाणात जनतेची सेवा घडत आहे. जो पर्यंत विकास व सेवा कार्य चालत राहील व जनसामान्य, गोरगरीब हा मदतीचा केंद्र बिंदु मानत राहाणार तो पर्यंत या परिवाराचे नाव लौकिक राहाणार आहे. आज तसे पाहिले तर मांजरा परिवाराने साखर उद्योगात भरारी घेतली आहे. विविध बंद पडणारे साखर कारखाने यशस्वी चालवित आहेत. तसे पाहिले तर लातूरात त्या परिवारास टक्कर देणार निर्माण झाला का? का झाला नाही किंवा को होवू शकला नाही हे जनतेला माहिती आहे. जनतेसोबत राहाणारा खरा नेता होवू शकतो का? जनतेची कामे करणाराच जनतेच्या मनातील ताईत बनू शकतो! हाती सत्ता असावी किंवा नसावी मात्र जनतेच्या प्रश्ना विषयी तळमळ, काम करण्याची जिद्द असावी लागते. आज सत्ता नसताना अण्णा हजारांचे वजन आहे. जरांगे पाटीलांचे आहे. हाती सत्ता असावीच असे नाही तर जनतेविषयीच्या कामाची तळमळ असली पाहिजे. त्यामुळे आज आदराने विलारसराव देशमुख यांचे नाव घेतले जाते. तसेच जो पर्यंत या भुतालावर सुर्य-चंद्र असणार आहे तो पर्यंत त्यांना जनता कदापी विसरणार नाही. त्याच्या जन्मदिनी आश्रू अनावर येतात कारण त्यांचे काम डोळयासमोर आहे. त्यामुळे विस्मरण होणे अशक्य आहे.

# ‘आदरणीय विलासरावजी देशमुख’ नावाचे एक अथांग पर्व

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर आपल्या कर्तृत्वाने, दिलदारअस्वभावाने आणि दूरदृष्टीने जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे लाडके व्यक्तिमत्व म्हणजे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री लोकनेते विलासराव देशमुख. विचार, विकास आणि विश्वास या त्रिसूत्रीच्या जोरावर सरपंच पदापासून ते देशाच्या केंद्रीय मंत्रिमंडळापर्यंतचा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. महाराष्ट्राला विकासाची नवी दिशा देणाऱ्या या विकासपुरुषाच्या जयंतीनिमित्त त्यांच्या गौरवशाली जीवनप्रवासाचे स्मरण होणारच...




सार्वजनिक जीवनात असे काही मोजकेच चेहरे होऊन गेले, ज्यांच्या केवळ आठवणीनेही चेहऱ्यावर हसू आणि डोळ्यांत कृतज्ञतेचे पाणी एकत्र येते. आदरणीय विलासराव देशमुख हे असंच एक ‘उमदं’ रसायन होतं. आज सन २०२६ च्या रणरणत्या उन्हात, संपूर्ण मराठवाडा होरपळतो आहे, लातूरचा लौकीक डागळतो आहे, तेव्हा लातूरच्या वेशीवर उभं राहिल्यावर एका माणसाची उणीव काळजाला चटका लावून जाते.

आदरणीय विलासरावजी असते तर? हा प्रश्न आज प्रत्येक माणसाच्या मनात आहे. कारण, संकट कितीही मोठं असलं तरी विलासरावांच्या चेहऱ्यावरचं ते आश्वासक हसू आणि ‘मी आहे ना!’ हा शब्दच अर्धे संकट दूर करायचा. बाभळगावच्या समृद्ध मातीतून सुरू झालेला त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. पुण्यातील गरवारे आणि विधी महाविद्यालयात घडलेला हा देखणा तरुण जेव्हा लातूरच्या न्यायालयात वकिली करू लागले, तेव्हा त्यांना कायद्याच्या पुस्तकांपेक्षा कोर्टाबाहेरच्या माणसांची दुःखं जास्त खुणावत होती. लातूरच्या दुष्काळ निवारण समितीचे सचिव म्हणून दुष्काळी भागांत फिरताना जनसामान्यांच्या प्रश्नांशी त्यांची पहिली नाळ जोडली गेली. बाभळगावचे ‘सरपंच’ ते राज्याचे ‘मुख्यमंत्री’ आणि पुढे देशाचा ‘केंद्रीय मंत्री’ ही त्यांची वाटचाल स्वकतृत्वाची राहीली, केवळ लोकांच्या अपार प्रेमाच्या जोरावर झाली होती.

आदरणीय विलासरावजी हे खऱ्या अर्थाने ‘संवादाचे आणि समन्वयाचे’ जागतिक विद्यापीठ होते. राजकारणात शरदराव पवारांकडे ‘चातुर्याचे प्रतीक’ म्हणून पाहिले जाते, तर विलासरावजी हे ‘विश्वासार्हतेचे प्रतीक’ होते. समोर कितीही मोठे राजकीय वादळ आले, तरी आपल्या तत्त्वांशी तडजोड न करता, सर्वांना सुखरूप सोबत घेऊन जहाज वादळाबाहेर काढण्याची किमया आदरणीय विलासरावांनी साधली होती. म्हणूनच, काँग्रेस पक्षाशी आणि पुरोगामी विचारसरणीशी त्यांची निष्ठा अखेरपर्यंत अविचल राहिली. अनेक पक्षांची खिचडी आघाडी सांभाळताना त्यांनी कोणावरही अन्याय होऊ दिला नाही. प्रशासनावरील त्यांची पकड इतकी विलक्षण होती की, अधिकारी कोणत्याही दडपणाशिवाय काम करायचे; कारण साहेबांनी कामाचा मुक्त वाव दिला होता. पहील्यांदा आमदार झाल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत, म्हणजेच १९८२ मध्ये ते गृहराज्यमंत्री झाले. त्यांनी जिल्हा पोलीस मुख्यालयाची इमारत, पोलीस वसाहत आणि शहरात तीन नवी पोलीस ठाणी उभी केली. सन १९८५ मध्ये शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री झाले. महसूल, सहकार, सार्वजनिक बांधकाम, परिवहन आणि संसदीय कामकाज यांसारख्या अष्टपैलू खात्यांचा कारभार सांभाळताना आदरणीय विलासरावजी हे केवळ सत्तेचे कारभारी नव्हते, तर ते आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते.

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यावर त्यांचा पहिला विचार बळीराजासाठी होता. माझा शेतकरी संकटात आहे, त्याची वीज कापू नका; हा त्यांचा आदेश प्रशासनाला मानावाच लागला. पुढे ४५ लाख शेतकऱ्यांची सुमारे साडेआठ हजार कोटींची कर्जमाफी असो, की पारदर्शकतेचा ‘माहितीचा अधिकार’ कायदा असो, विलासरावांचे निर्णय कायम दूरगामी ठरले. मुंबईला मोनोरेल, मिठी नदी प्रकल्प आणि झोपडपट्टी पुनर्वसन देऊन त्यांनी जागतिक मंचावर महाराष्ट्राचा ब्रँड पोहोचवला. लातूरला सहकाराचा ‘मांजरा पॅटर्न’ आणि शिक्षणाची पंढरी बनवताना त्यांनी सामाजिक समतेचा विचार कधी सोडला नाही. म्हणूनच त्यांच्या काळात मुंबई, पुणे आणि नागपूर विद्यापीठांच्या कुलगुरूपदांवर समाजातील विद्वान चेहऱ्यांना संधी मिळाली.

राजकारणाच्या पलीकडे आदरणीय विलासराव एक ‘व्यक्ती आणि वल्ली’ होते. त्यांची विनोदबुद्धी, हजरजबाबीपणा आणि मिश्किल राजकीय चिमटे विरोधकांनाही त्यांचे फॅन बनवायचे. आदरणीय विलासराव सभागृहात बोलायला उभे राहिले की, विरोधकांचे बाण आपोआप म्यान व्हायचे. त्यांना साहित्याची, नाटकांची आणि संगीताची अफाट जाण होती. सुरेश भटांच्या गझला त्यांना तोंडपाठ असायच्या. चित्रपट क्षेत्राप्रमाणेच त्यांनी महाराष्ट्राच्या लोककलेतील ‘तमाशा’ कलावंतांचे मानधन दुप्पट करून त्यांच्या वृद्धत्वाचा आधार बनण्याचे काम केले. आज त्यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त त्यांची उणीव खूप मोठी आहे.


आज राज्याच्या राजकारणात एक वैचारिक गोंधळ दिसतो आहे, मित्रपक्ष दुरावले आहेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्व घटकांना एकत्र बांधून ठेवणारा तो ‘दिलदार’ चेहरा आज आपल्यात नाही. परंतु, आदरणीय विलासरावजींनी दाखवलेला मार्ग, त्यांनी दिलेला ‘विचार, विकास आणि विश्वासाची’ त्रिसूत्री आजही आपल्याला दिशा दाखवू शकते. लातूरकरांनी आणि महाराष्ट्राने लोकसहभागाची त्यांची हीच शैली अंगीकारली, तर आजच्या समस्यावर आपण नक्कीच मात करू शकू. एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या, दिल्ली दरबारात महाराष्ट्राचा बुलंद आवाज बनलेल्या आणि शेवटच्या श्वासापर्यंत उमदेपण जपलेल्या या ‘विकासपुरुषाला’ आणि जनसामान्यांच्या लाडक्या ‘नेत्यांना’ कोटी कोटी मानाचा मुजरा!



**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**रा. करकट्टा ता. जि. लातूर**
**मो. ९८९०५७७१२८**

# राज्यात कायम लोकांच्या हृदयात नाव असणारे लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब

राज्यात व देशात स्वतः च्या कार्यावर ओळख करून देणारे लोकनेते म्हणून आजही राज्यात देशात विलासराव देशमुख साहेब यांची ओळख कायम राहिलेली आहे राज्यात आठ वर्ष मुख्यमंत्री पद भोगणारे विलासराव देशमुख हे कायम लोकांच्या हिताचे निर्णय घेणारे लोकमान्य लोकनेते अशी ओळख राज्याच्या कानाकोपऱ्यात आजही आहे प्रत्येक क्षेत्रात त्यांनी त्यांच्या काळात भरीव योगदान देत लोकांच्या मनात कायम आदरातिथ्य असणारे हसतमुख लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांची आज २६ मे रोजी त्यांची ८१ वी जयंती त्या निमित्ताने त्यांना विनम्र आदरांजली



**लातूरला विकासाचा पहिला घास**

राज्यात जे नव ते लातूरला हवं असं विलासराव देशमुख साहेब त्यांचं नेहमी वाक्य असायचे ते शब्दाला बांधील राहायचे एक विकसनशील नेतृत्व म्हणून राज्याच्या कानाकोपऱ्यातून एकही जिल्हा नाही तिथं विलासराव देशमुख यांच्या हस्ते विकासांच काम झाले नाही प्रत्येक व्यक्तींना मदत करत आपल्या लातूरच्या लोकांना तर सहजपणे उपलब्ध राहायचे कोण कुठल्या राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते असतील त्यांनाही मदत करायचे हे सगळ करत असताना राज्यात कुठलाही निधी असेल किंवा नवीन योजना सुरू केली असेल तर लागलीच लातूरला द्या असं रोखठोक बोलणारे शब्दाला बांधील असणारे लोकमान्य नेते विलासराव देशमुख साहेब होते त्यांच्या कार्याचे कितीही आपन लिहीत बसलो तरी ते संपणार नाहीअसे हे विकसनशील नेतृत्व होते राज्यात नावलौकिक असलेल्या मोजक्या मुख्यमंत्री पदाच्या यादीत विकास भिमुख नेतृत्व म्हणून विलासराव देशमुख यांचे नाव आजही राज्यात घेतले जाते

**लातुरात शासकीय कार्यालये आणली**

लातूरला विकासाचा वेग प्रचंड मोठा वाढवत मराठवाड्यात विकासभिमुख शहर म्हणून लातूरची ओळख राज्यभर लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या मुळे झाली आजही लातूर म्हटले की विलासराव देशमुख साहेब यांचे लातूर अशी ओळख राहिलेली आहे मराठवाड्यातील विभागीय कार्यालय लातूरला आणण्याचे काम यांच्याच कार्यकाळात झाले विशेषतः विभागीय शिक्षण बोर्ड, विभागीय कृषि अधिकारी,सिंचन, विद्युत मंडळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ही त्यांचीच देणं आहे

**दुष्काळ भाग ते विकासाच्या नव्या वाटेवर**

एकेकाळी मराठवाड्यात दुष्काळी भाग म्हणून लातूर जिल्ह्याकडे लोक बघायचे मात्र १९९ सालापासून लातूरच्या विकासाची चळवळ सुरू झाली लोकनेते विलासराव देशमुख राज्याचे मुख्यमंत्री झाले त्यानंतर विकासाचा वेग प्रचंड मोठा झाला रस्ते,सिंचन प्रकल्प सुरू झाले वेगवेगळ्या योजना राबवून लातूरच्या विकासाला चालना मिळाली लोकनेते विलासराव देशमुख यांनी पुढच्या ५० वर्षाचे लातूर व्हिजन कसे असावे यावर विकासाचा प्लॅन तयार करून लातूर शहरात उड्डाण पुल बांधला जिल्ह्यातील मुख्य सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी आणून लोकांना चांगली सुलभ सेवा कशी मिळेल अशा अनेक बऱ्याच गोष्टी त्यांनी केल्या त्यामुळे आज आपल्याला शासकीय सुविधा उपलब्ध होत आहेत त्याचे सर्व श्रेय लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या कडे जाते हे निर्विवाद सत्य आहे एकेकाळी मराठवाड्यात दुष्काळी भाग म्हणून लातूरची ओळख होती ती पुसून काढण्याचे काम साहेब यांनी केले आज लातूर म्हटले की सर्वागीण विकास असलेले शांत शहर शिक्षण ,व्यापार, उद्योग इंडस्ट्रीज असलेले शहर म्हणून लातूरची ओळख राज्यभर राहिलेली आहे

**जिल्ह्यात सहकार चळवळ वाढवली**

राज्यात सर्वांना मदत करीत असताना लातूर जिल्ह्याला झुकते माप देण्याचे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब यांनी केले ४० वर्षापूर्वी लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांनी मांजरा साखर कारखाना उभा केला पुढे सहकारात हळूहळू पकड बसल्याने त्यांनी रेणा, मारुती महाराज, विलास, जागृति साखर कारखाने उभे केले मांजरा साखर कारखाना सुरू केला त्यांच्याच नेतृत्वाखाली याच परिवारातील संस्थांचे १० साखर कारखाने उभे राहिले आहेत नुसते उभे राहिलेले नसून आज शेतकऱ्यांचे मंदिरे झालेली आहेत याचे सर्व श्रेय लोकनेते विलासराव देशमुख यांच्याकडे जाते त्यानंतरमाजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांनी या मांजरा परिवारातील साखर कारखाने अतिशय सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून लोकांच्या विश्वासाला पात्र ठरली आहेत राज्यात आज सहकार क्षेत्र म्हटले की लातूरचा नावलौकिक उल्लेख होतोय त्यामागे लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या कार्याची आठवण त्यांनी केलेले कार्य लोकांच्या सेवेसाठी तत्पर सेवेत राहणारे विलासरावजी देशमुख साहेब कायम आठवणीचे लोकमान्य लोकांचें लोकनेते म्हणून जीवन जगले आज त्यांच्या कार्यामुळे राज्यात विलासराव देशमुख साहेब यांच्यावर प्रेम करणारा लाखो चाहता वर्ग आहे लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांची आज ८१ वी जयंती निमित्त विनम्र आदरांजली..

**हरीराम कुलकर्णी**
**जेष्ठ पत्रकार लातूर**

**तुमच्या स्मृतींना समर्पित**
**काही घोषवाक्ये:**

सत्कर्मयोगे जीवन घालवावे, सर्वा मुखी मंगल बोलवावे!
कार्यातुनी येथे ऊरली अवघी आपली किर्ती
दिपस्तंभ हा विचारांचा, जपूया ठेवा लोकसेवेचा
स्मरण होता तुमचे, चैतन्य लाभते मनाला!
खरी ती एकच सेवा, करीत जावी लोकसेवा!
शुद्ध निर्मळ केली लोकसेवा, आपल्या नेतृत्वाचा महिमा!
लोकसेवेचा हा वसा, आपला लाभला वारसा!
तुमच्या कार्याची ज्योत, युगायुगांसाठी प्रेरणास्रोत!
लोकसेवेचा मार्ग दाखविला, आपला महिमा अपार!
दिपले डोळे, जोडले हात, लोकसेवेचे कार्य आपले महान!
नांदतो सदा सुखाने, कीर्ती गातो मुखाने!
कल्याण केले जनाचे, कीर्ती गातो मुखाने!
आपले कार्य इथले पाहता, वाटते तुम्ही येथेच राहता!
स्वप्न तुमची, समर्पण आमचे...!
प्रेरणा तुमची मनात स्मृती, लोकसेवेचा मार्ग दाखवती!
नित्य स्मरते आपली मूर्ती, अविरत जपूया विचार, कीर्ती!
लोकसेवेत समर्पित कतृत्व! लोकभक्तितुनी आकारले नेतृत्व!
जाणत्याचे जाणावे प्रसंग, जाणत्याचे घ्यावे रंग!
तेजस्वी जीवने जयाची, अंतरी तळमळ लोकसेवेची!
साच आणि मवाळ, मितळे आणि रसाळ, शब्द जैसे कल्लोळ अमृताचे!
लोकसेवेत साकारले कतृत्व! लोकभक्तित अर्पिले नेतृत्व!
तुमचे नेतृत्व लाभले आम्हांला, सुजलाम सुफलाम झाली भूमी!
स्मरण होता तुमचे, प्रेरणा मिळते लोकसेवेला!
आपले कार्य एका युगाचे, स्मरण राहील युगायुगाचे!
तेजस्वी जीवने जयांची, अंतरी तळमळ लोकसेवेची!

# पाठदुखीचा त्रास होत असेल तर उपयोगी टिप्स

चुकीची बसण्याची पद्धत किंवा तासनतास एकाच स्थितीत काम केल्यामुळे पाठदुखीचा त्रास होतो. पाठदुखीपासून त्वरित आराम मिळवण्यासाठी बर्फाचा शेक (खलश रिलझ), हलका मसाज, स्ट्रेचिंग व्यायाम आणि योग्य विश्रांती घेणे अत्यंत फायदेशीर ठरते.पाठदुखी कमी करण्यासाठी काही सोप्या आणि प्रभावी टिप्स खालीलप्रमाणे आहेत:१. घरगुती उपाय आणि शेक (केश ठशाशवळशी)बर्फ आणि गरम शेक: वेदनेच्या पहिल्या ४८ ते ७२ तासांत दुखणाऱ्या भागावर बर्फाचा शेक लावावा, ज्यामुळे सूज कमी होते. त्यानंतर गरम पाण्याने शेकल्यास स्नायूंना आराम मिळतो.तेलाची मालिश: तिळाच्या किंवा मोहरीच्या कोमट तेलाने हलक्या हाताने मसाज केल्याने रक्ताभिसरण सुधारते.हळदीचे दूध: रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध प्यायल्याने शरी- रातील सूज आणि वेदना कमी होण्यास मदत होते.२. बसण्याची आणि झोपण्याची योग्य पद्धत (Postures)बसताना: संगणक (Laptop) किंवा टीव्हीसमोर बसताना पाठ ताठ ठेवावी. कंबरेला आधार देण्यासाठी पाठीमागे कुशन (उींहळेप) किंवा उशी वापरावी.झोपताना: झोपताना पाठीखाली किंवा गुडघ्याखाली उशी घेऊन झोपावे. पोटावर झोपणे टाळावे.३. प्रभावी व्यायाम (Stretching Yoga)मर्जरी आसन (Cat-Cow Pose): हे आसन पाठीच्या कण्याला लवचिकता देते आणि ताण कमी करते.भुजंगासन (उेलीर झीेश): पाठीचे स्नायू बळकट करण्यासाठी हे आसन उपयुक्त आहे. चालणे: दररोज हलक्या गतीने चालणे (Walk- ळपस) पाठीच्या आरोग्यासाठी उत्तम असते.४. जीवनशैलीत बदल (Lifestyle Changes) जास्त वेळ बसणे टाळा: ऑफिसमध्ये काम करत असल्यास दर ४० ते ५० मिनिटांनी खुर्चीवरून उठा आणि थोडी हालचाल करा.वजन नियंत्रित ठेवा: वजन वाढल्यामुळे पाठीवर अतिरिक्त ताण पडतो.हायड्रेटेड राहा: भरपूर पाणी प्या, यामुळे मणक्यांमधील चकत्यांना (ऊळीली) ओलावा मिळतो.५. केव्हा डॉक्टरांना भेटावे? (थहशप ीें शिश र वेल्ीी) जर पाठदुखी दोन-तीन दिवसांत घरगुती उपायांनी बरी झाली नाही, कंबर किंवा पाठदुखीमुळे चालणे कठीण झाले असेल, किंवा वेदना पायापर्यंत जात असतील, तर वेळीच मायो क्लिनिक (चरूे उश्रळपळल) किंवा अस्थिरोग तज्ज्ञांचा सल्ला



# झुरळाची भीती का वाटावी?

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या विधानाचे समर्थन करता येत नाही; मात्र देशात राजकीय विरोधक व टीकाकार यांच्या अवकाशाचा संकोच होत आहे हे मान्य करावे लागेल. 'सीजेपी' त्याचेच प्रतीक आहे. झुरळ, एक य:कश्चित कीटक. घरी, कार्यालयात आणि अनेक ठिकाणी त्याचा उपद्रव जाणवतो. गेल्या आठवड्यात त्याला भारतात अचानक मोठे महत्त्व मिळाले. समाज माध्यमांवर 'कोक्रोच जनता पार्टी'चा बोलबाला झाला. अर्थात हा पक्ष कपोल कल्पितच आहे; मात्र या पक्षाने अल्पावधीत दीड कोटी अनुयायी किंवा 'फॉलोअर्स' मिळवले. त्यामुळे प्रामुख्याने सत्तेत असलेले पक्ष धास्तावले. विरोधकांनी त्याची दखल घेतली. 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वरील या पक्षाच्या 'हँडल'मुळे देशाच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होत असल्याचा अहवाल गुप्तचर खात्याने (इंटेलिजन्स ब्यूरो) दिल्यावर ते अडवण्याचा -ब्लॉक करण्याचा-आदेश इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान खात्याने 'एक्स'ला दिला. त्यांना तसे करण्यास माहिती व नभोवाणी खात्याने सांगितले असे स्पष्टीकरण या खात्याने दिले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी गेल्या आठवड्यात केलेल्या एका विधानाचा या ऑनलाईन पक्षाला आधार आहे. एका प्रकरणाच्या सुनावणीत सूर्य कांत यांनी बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी केली. त्यावर वादंग निर्माण झाला. त्यामुळे सूर्य कांत यांना आपल्या विधानाचा विपर्यास झाला. बनावट पदव्या मिळवून माध्यमांत प्रवेश करणार्यांबद्दल आपण मत व्यक्त केले. ते सर्व युवा वर्गाबद्दल नव्हते, असा खुलासा करावा लागला.




असंतोषाचे प्रतीक नकोसे?

परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. सूर्य कांत यांचे विधान माध्यमे व समाज माध्यमांद्वारे देशात सर्वत्र पोचले होते. त्यावर विनोद, 'मीम्स' तयार झाले व तेही लोकप्रिय झाले. 'सीजेपी' हे नाव, त्याचे बोधचिन्ह कोणाची नक्कल करत आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या मागची कल्पकता अभिजित दिपके या तरुणाची आहे. अमेरिकेतील बोस्टन विद्यापीठातून त्याने पदवी मिळवली आहे. राजकीय संज्ञापन व्यूहरचनाकार हा त्याचा व्यवसाय आहे. अमेरिकेस जाण्यापूर्वी 'आम आदमी पक्षा'साठी तो काम करत होता. 'सीजेपी' हा एक विनोद म्हणूनच आपल्याला सुचला, असे त्याने म्हटले आहे. या पक्षाचे सदस्य होण्यासाठी 'व्यक्ती, बेरोजगार आणि आळशी असली पाहिजे, कायम ऑनलाईन असली पाहिजे आणि व्यावसायिक दर्जाची बडबड करता आली पाहिजे'; असे 'निकष' त्याने ठरवले आहेत. हा विनोद असला तरी त्यात उपरोध आहे. हजारो भारतीयांनी त्याचे 'गुगल' अर्ज भरून त्यास प्रतिसाद दिला. काही ठिकाणी झुरळाचे पोषाख धारण करून तरुण आले. वृत्तपत्रांनी या घडामोडींची दखल घेतल्याने ऑनलाईन नसलेल्या व्यक्तींपर्यंतही हा कथित 'पक्ष' पोचला. देशातील सामान्य वर्गात नाराजी आहे, असंतोष आहे त्याचे प्रतीक हे 'झुरळ' आणि 'सीजेपी' बनले. हा एक भाग झाला. मग त्याचे खाते बंद करण्याचा आदेश सरकारने का दिला?

त्याच्या अनुयायांची संख्या 'भारतीय जनता पक्षाच्या' अनुयायांपेक्षा वाढली. जगातील सर्वांत मोठा पक्ष अशी शेखी मिरवणार्या या पक्षाला व त्यांच्या परिवारास ही बाब रुचली नसावी. त्यासाठी सध्याचे राजकीय कथन लक्षात घेतले पाहिजे. पाच राज्यांतील निवडणुका होण्यापूर्वी 'घुसपैठिये' म्हणजे 'घुसखोर' हा शब्द प्रचारात आला. ओळखपत्रे नसलेल्या स्थलांतरितांसाठी 'वाळवी' ही उपमा आली. स्वतंत्र विचार मांडणारे व टीकाकार यांना 'शहरी नक्षलवादी' म्हटले जाते.'राष्ट्र विरोधी' आणि 'गद्दार' हे शब्द राजकीय विरोधकांना बदडण्यासाठी वापरले जातात. हे सर्व शब्द प्रयोग सत्ताधारी वापरतात. आपल्यावरील टीका रोखण्यासाठी कायद्यात बदलही ते करत आहेत. जनतेच्या जिव्हाळ्याचे मुद्दे संसदेत व बाहेरही चर्चेत येऊ दिले जात नाहीत. सर्वोच्च न्यायालय हा सामान्यांसाठी त्यामुळेच आधार वाटतो. बांगला देश व नेपाळमध्ये युवकांनी-'जेन झेड- सत्तांतर घडवले. सूर्य कांत यांच्या विधाना- तून प्रेरणा घेऊन देशातील युवक तसे काही करतील असे सरकारला वाटले का? झुरळ हा कीटक नष्ट करणे अशक्य असते. त्यामुळेच अस्तित्वात नसलेला 'सीजेपी' हा देशास धोका वाटून त्याचे खाते बंद केले गेले असेल का? क्षुद्र झुरळाची सत्तेस भीती का वाटावी? हा प्रश्न उरतो.

# आजकाल कुरळ्या केसांच्या मुलीही भारावतात युवकांना

शारिरीक व्यंगावरून एखाद्याला चिडवणं हे आपल्याकडे सहज घडणारी क्रिया म्हणून पाहिलं जातं. त्या दोघींना तर त्यांच्या कुरळ्या केसांवरून चिडवलं जायचं. कुरळे केस म्हणजे नसती आफत त्यांना वाटली होती. मात्र त्यांना वाटणाऱ्या या 'आफत'ने त्यांना कोटींची उलाढाल करणाऱ्या उद्योगाची उद्योजिका बनवले. ही गोष्ट आहे 'मेनटेन (चरपशींरळप) स्टोअर प्रा.लि.'च्या संचालिका युबा रोमीन आगा आणि हिनशरा मानदथ हबीब यांची. कुरळे केस असलेल्या दोन महिला, युबा आणि हिनशरा या दोघी सुद्धा कुरळ्या केसांच्या. कुरळ्या केसांच्या व्यक्तींनी तयार केलेल्या व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून या दोघींची ओळख झाली.

युबा मुंबईमध्ये लहानाची मोठी झाली. तिने होली क्रॉस हायस्कूलमध्ये शिक्षण घेतले आणि नंतर तिने २००८ मध्ये नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील डेंटल स्कूल आणि हॉस्पिटल मधून दंत वैद्यकशास्त्राची पदवी संपादन केली. हिनशरा ही कोची येथील एका व्यापारी कुटुंबातील आहे. तिने माध्यमिक शिक्षण कोचीच्या राजगिरी पब्लिक स्कूलमध्ये पूर्ण केले, तर तामिळनाडूच्या निलगिरी येथील लॉरेन्स स्कूलमधून १२वी पूर्ण केली. त्यानंतर तिने क्राइस्ट युनिव्हर्सिटी, बंगळूरु येथून वाणिज्य शाखेची पदवी प्राप्त



केली. ती डेलॉइट या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये ऑडिट असिस्टंट म्हणून काम करत होती. २०१८ मध्ये त्यांनी प्रत्येकी ३०,००० रुपये गुंतवून केसांची निगा राख- णारा 'मेनटेन' हा ब्रँड सुरू केला.युबाचे शिक्षण विज्ञान शाखेतून झाल्यामुळे उत्पादनांबद्दलच्या सुरुवातीच्या संशोधनात तिला फायदा झाला. २०१६-१७ मध्ये कुरळ्या केसांची निगा राखणारी उत्पादने युबाला सापडली जी भारतात उपलब्ध नव्हती. तिला ते अमेरिका किंवा इंग्लंडमधून मागवावे लागत, ज्यामध्ये बरेच शिपिंग शुल्क होते आणि ते खूप महागदेखील होते. जेव्हा युबाला भारतीय बाजारपेठेत कुरळे केसांच्या उत्पादनांची कमतरता जाणवली तेव्हाच तिने अशी उत्पादने भार- तात निर्माण करण्याचा निश्चय केला.खरं तर युबाला तिच्या कॉलेजच्या दिवसांमध्ये, केसांमुळे खूप छेडछाड आणि उपहासाचा सामना करावा लागला. ती जेव्हा कार्यक्रम किंवा महोत्सवामध्ये कुरळे केस दाखवण्याचा प्रयत्न करायची, तेव्हा लोक खोडकर कमेंट्स करायचे. तिच्या हायस्कूलच्या दिवसातील एक प्रसंग आहे. एका लेक्चरमध्ये शिक्षकांनी त्यांचा लहान कंगवा गंमतीने युबाच्या डोक्यावर ठेवला आणि म्हटले की, मी हा कंगवा तुझ्या डोक्यात घालण्याचा प्रयत्न केला तर? मी तो पुन्हा शोधू शकणार नाही! सारा वर्ग हसायला लागला. मात्र याचा युबाला खूप राग आला होता. ती मनातून दुखावली सुद्धा होती.जेव्हा युबा आणि हिनशरा यांनी कुरळे केसांची उत्पादने बनवण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यांनी क्सेसरीजपासून सुरुवात केली. त्यांनी त्यांच्या स्वतःच्या गरजा आणि वैयक्तिक अनुभवावर आधारित विविध उत्पादनांची श्रेणी तयार केली आहे. त्यांनी एका स्थानिक शिंपीला गाठले. रेशीम आणि सॅटिनपासून बनवलेल्या केसांच्या उपकरणांची रचना तयार केली. ऑक्टोबर २०१८ मध्ये, त्यांनी इन्स्टाग्रामद्वारे 'मेनटेन' लाँच केले. पुढे त्यांनी फ्लेक्ससीड्सपासून बनवलेली केसांची टोपी सादर केली, ज्याला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. मेनटेन हे केस आणि हीट कॅप्स, स्क्रंचीज आणि केसांची काळजी घेणारी उत्पादने बनवते, ज्यामध्ये मॉइश्चरायझिंग शैम्पू, कंडिशनर, क्लॅरिफायिंग शैम्पू आणि को-वॉश यांचा समावेश आहे. या दोघी पहिल्यापासून कुरळे केस असलेल्या व्यक्तींच्या व्हॉट्सप समुदायाचा भाग असल्याने, त्यांना ग्राहक मिळवण्यासाठी जास्त दूर जावे लागले नाही. त्यांना सुरुवातीला मिळा- लेला प्रतिसाद जबरदस्त होता. मेनटेनचे उत्पादन १५० रुपयांपासून सुरू होते. सर्वांत महागडे उत्पादन हे २,२४० रुपयांपर्यंत जाते.पहिल्याच आर्थिक वर्षात, सहा महिन्यांपेक्षा कमी कालावधीत त्यांनी २० लाख रुपयांची उलाढाल केली होती. मेनटेनला वेबसाइटद्वारे विक्रीतील ६०%, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आणि इतर तत्सम प्लॅटफॉर्मसारख्या तृतीय-पक्षाच्या वेबसाइटद्वारे ३०% आणि सॅलोनसोबत भागीदारीद्वारे १०% उत्पन्न मिळते. व्यावसायिक मॉडेल्स वापरण्याऐवजी युबा आणि हिनशरा स्वतःची उत्पादने स्वत:च प्रदर्शित करतात. ते पाहून ग्राहक त्यांच्या प्रामाणिकपणाकडे आकर्षित होतात. ब्रँडबद्दलचा त्यांचा आत्मविश्वास आणि समर्पणाचा हा पुरावा आहे. हे केवळ विपणनासाठी नाही, तर आपण जे ग्राहकांना जे देणार आहे, त्यावर मनापासून विश्वास ठेवण्याबद्दल आणि त्याच्या पाठीमागे दृढ विश्वास- ाने उभे राहण्याबद्दल आहे. युबाचे रोमीन आगा या व्यावसायिकाशी लग्न झाले असून रिदान हा ११ वर्षांचा मुलगा आणि आयशा व अमीर ही ६ वर्षांची जुळी मुले आहेत. हिनशराचा कोचीमध्ये पीव्हीसी पाइप्सचे उत्प- ादन करणारा कौटुंबिक व्यवसाय आहे. ती त्यातदेखील सहभाग घेते. शार्क टँक इंडियाच्या अमन गुप्ता यांनी गेल्या वर्षी ७५ लाख रुपयांची मेनटेनमध्ये गुंतवणूक केली होती. मेनटेनने १.१४ कोटी रुपयांची उलाढाल केली आहे.

कोचीची हिनशरा आणि मुंबईची युबा यांच्यामध्ये १२ वर्षांचे अंतर आहे. हिनशरा २५ वर्षांची आहे, तर युबा ३७. मात्र वयाचा फरक असूनही त्यांच्यामध्ये एक उत्तम भावबंध निर्माण झालेला आहे. त्या एक कुटुंब म्हणून काम करतात. वेगवेगळ्या शहरांत राहूनसुद्धा परस्पर विश्वास आणि एकमेकांबद्दल असलेला आदर हा युबा आणि हिनशरा यांच्यामधील पाया आहे. या पायावरच 'मेनटेन'चा डोलारा उभा आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



खरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट होते. शीघ्रपतनावर उपचार करताना या लैंगिक प्रतिसादावर विशेष लक्ष द्यावं लागतं.डॉ. संजय देशपांडे, कन्सल्टंट सेक्सॉलॉजिस्टखरं तर शीघ्रपतन हा काही आजार नाही. ती एक सवय आहे. पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात. स्खलन झाल्यानंतर ताठरता कमी होत-होत नष्ट

## २ Joke — विनोद




बाबू - तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू - माझ्याच वयाचे आहेत.
बाबू - अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू - का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message — संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .

## ४ Thought — सुविचार



ज्याला शत्रू नसतात त्याला अनुयायी देखील नसतात.- **डॉन प्याट**

**संस्कृत सुभाषित**

**रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।**
**देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रिय:।।**

**मराठीत अर्थ**

आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.


# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार

### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दु:खी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल



### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अव- ास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनम नधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस




## थोडक्यात/ संक्षिप्त

### ३९ वर्षीय भारताच्या क्रिकेटपटूचे सामना खेळतानाच आकस्मिक निधन;

मुंबई–भारतीय क्रिकेटसाठी फारच धक्कादायक बातमी समोर आली आहे. क्रिकेट खेळत असताना हृदयविकाराच्या झटक्याने खेळाडूचं निधन झालं. बंगळूरु येथे स्थानिक विभागीय क्रिकेट सामन्यादरम्यान हृदयविकाराचा झटका आल्याने कर्नाटकचे माजी रणजी क्रिकेटपटू एस. एल. अक्षय यांचे निधन झाल्याचे वृत्त आहे. शिवमोग्गा येथील रहिवासी असलेले ३९ वर्षीय अक्षय यांनी यापूर्वी रणजी ट्रॉफीमध्ये कर्नाटकचे प्रतिनिधित्व केलं होतं आणि ते कर्नाटक प्रीमियर लीगमध्येही खेळले होते, जी आता महाराजा ट्रॉफी केएससीए टी–२० म्हणून ओळखली जाते.घटना घडली तेव्हा अक्षय हे केएससीए तिसऱ्या विभागातील सामन्यात सॅफायर सीसीकडून खेळत होते. त्यांनी चार षटके टाकल्यानंतर अस्वस्थ वाटत असल्याची तक्रार केली. त्यानंतर त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र, डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही त्यांना मृत घोषित करण्यात आलं. एस. एल. अक्षय हे २०१४–१५ रणजी ट्रॉफी विजेत्या कर्नाटक संघाचा भाग होते. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्यांनी आपल्या वेगवान गोलंदाजीने विशेष छाप सोडली होती. त्यांच्या अचानक निधनामुळे कर्नाटक क्रिकेट वर्तुळात शोककळा पसरली आहे.मफ्अक्षय यांनी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये कर्नाटकचे अत्यंत उल्लेखनीय प्रतिनिधित्व केलं. खेळाडू म्हणून कारकीर्द संपल्यानंतरही त्यांनी क्रिकेटप्रती असलेली निष्ठा आणि जिद्द कायम ठेवली. कनिष्ठ स्तरावरील प्रशिक्षक म्हणून त्यांनी अनेक युवा क्रिकेटपटूंना घडवण्यात आणि मार्गदर्शन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

### नोव्हाक जोकोविच दमदार सुरुवात; २५व्या ग्रँडस्लॅमच्या दिशेने विजयी पाऊल

दिल्ली–नोव्हाक जोकोविच याने फ्रेंच ओपन २०२६ स्पर्धेत विजयी सलामी देत आपल्या विक्रमी २५व्या ग्रँडस्लॅम विजेतेपदाच्या मोहिमेला शानदार सुरुवात केली. पॅरिसमधील रोलाँ गॅरोस कोर्टवर झालेल्या पहिल्या फेरीच्या सामन्यात जोकोविचने फ्रान्सच्या जिओव्हानी म्पेत्शी पेरिकार्ड याचा ५–७, ७–५, ६–१, ६–४ अशा सेट्समध्ये पराभव केला. सामन्याच्या सुरुवातीला मात्र सर्बियन स्टारला कडवी झुंज द्यावी लागली. घरच्या प्रेक्षकांच्या जोरदार पाठिंब्यावर खेळणाऱ्या जिओव्हानीने पहिल्याच सेटमध्ये आक्रमक खेळ करत जोकोविचला दबावाखाली ठेवले. विशेषत: त्याच्या वेगवान आणि अचूक सर्व्हिसमुळे जोकोविच अनेकदा अडचणीत सापडला. ६–५ अशी आघाडी घेतल्यानंतर जिओव्हानीने जोरदार मएसफमारत पहिला सेट आपल्या नावावर केला आणि प्रेक्षकांमध्ये उत्साहाची लाट निर्माण केली.

विशेष म्हणजे, गेल्या १७ वर्षांत फ्रेंच ओपनच्या पहिल्या फेरीत जोकोविचविरुद्ध सेट जिंकणारा तो पहिलाच खेळाडू ठरला. त्यामुळे सुरुवातीला या सामन्यात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र अनुभवी जोकोविचने दुसऱ्या सेटपासून आपला खरा खेळ दाखवायला सुरुवात केली. संयम, अचूक फटके आणि अनुभवाच्या जोरावर त्याने सामना हळूहळू आपल्या नियंत्रणात आणला. दुसरा सेट ७–५ ने जिंकल्यानंतर त्याचा आत्मविश्वास अधिक वाढला आणि तिसऱ्या सेटमध्ये त्याने अक्षरश: वर्चस्व गाजवत ६–१ अशी एकतर्फी बाजी मारली.

### नवख्या फलंदाजाची टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऐतिहासिक खेळी

दिल्ली–रवांडाचा फलंदाज हमजा खानने टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यात शानदार नाबाद १६४ धावा करुन नवा विक्रम केला आहे. पुरुषांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासातील ही दुसरी सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. रवांडाच्या या फलंदाजानं केवळ ६५ चेंडूंमध्ये आक्रमक फलंदाजी करताना नऊ चौकार आणि १५ षटकार ठोकत २५२.३० च्या स्ट्राईक रेटनं धावांचा पाऊस पाडला. हमजा खाननं आपल्या खेळीत मारले १५ षटकार : हमजा खाननं आपल्या खेळीत एकूण १५ षटकार ठोकले, ज्यामुळं तो टी–२० आंतरराष्ट्रीय डावात सर्वाधिक षटकार मारणाऱ्यांच्या सर्वकालीन यादीत चौथ्या स्थानावर पोहोचला आहे. रविवारी गॅबोरोन इथं आयसीसी पुरुष टी–२० विश्वचषक आफ्रिका उप–प्रादेशिक पात्रता फेरीदरम्यान कोट डीफ्आयव्हरविरुद्ध हमजा खानच्या खेळीनं अनेक जागतिक क्रिकेट विक्रम मोडले. त्याच्या खेळीमुळं, रवांडानं २० षटकांत २८८२ अशी मोठी धावसंख्या उभारली, जी पुरुषांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सातवी सर्वोच्च सांघिक धावसंख्या आहे.पुरुषांच्या टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यातील सर्वोच्च धावसंख्येचा विक्रम कोणाच्या नावावर : उजव्या हाताचा फलंदाज हमझानं या डावात वर्चस्व गाजवले. त्याने पॉवरप्लेमध्ये आक्रमक फलंदाजी केली आणि अखेरच्या षटकांमध्ये सातत्याने धावा करत आयव्हरी कोस्टच्या गोलंदाजांना निष्प्रभ केलं. यासह, तो आता अॅरॉन फिंचनंतर दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. पुरुषांच्या टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा विक्रम ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार अॅरॉन फिंचच्या नावावर आहे.

# सामन्यांसाठी रिजर्व डे नसल्याने पावसामुळे सामना रद्द झाल्यास कसा ठरणार विजेता?

**अंतिम सामना: ३१ मे २०२६, अहमदाबाद, नरेंद्र मोदी स्टेडियम (संध्या.७ वाजता)**

नवी दिल्ली: आयपीएल २०२६ चे प्लेऑफचे समने २६ मे पासून खेळवले जाणार आहेत. या सामन्यात पावसाने हजेरी लावली तर सामन्याचा निकाल कसा लागणार, जाणून घेऊया.

आयपीएल २०२६ अखेरच्या टप्प्यात येऊन पोहोचलं आहे. गट टप्प्यातील ७० सामने संपले असून प्लेऑफचे चार संघ ठरले आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, गुजरात टायटन्स, सनरायझर्स हैदराबाद व राजस्थान रॉयल्स हे चार संघ प्लेऑफमध्ये पोहोचले असून जेतेपदासाठी भिडतील. २६ मे पासून प्लेऑफच्या सामन्यांना सुरूवात होणार असून ३१ मे रोजी अंतिम सामना खेळवला जाईल. प्लेऑफच्या सामन्यांना राखीव दिवस नसून पावसाने सामन्यात व्यत्यय आणला तर सामन्याचा निकाल कसा लागणार, जाणून घेऊया.




गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू क्वालिफायर–१ मध्ये गुजरात टायटन्सविरूद्ध भिडताना दिसतील. हा सामना धरमशाला येथे खेळवला जाईल. यानंतर एलिमिनेटर आणि क्वालिफायर २ सामने न्यू चंडीगढमध्ये खेळवले जातील, तर अंतिम सामना ३१ मे रोजी अहमदाबादमध्ये होणार आहे. क्वालिफायर १, एलिमिनेटर आणि क्वालिफायर–२ साठी कोणतेही राखीव दिवस नाहीत.

आयपीएल २०२६ प्लेऑफच्या सामन्यांसाठी राखीव दिवस आहे का?

आयपीएलच्या नियमांनुसार, पहिल्या तीन प्लेऑफ सामन्यांसाठी राखीव दिवस नाहीत. मात्र, अंतिम सामन्यासाठी राखीव दिवस ठेवला जाणार आहे. २०२३ च्या आयपीएलमध्येही अंतिम सामन्यासाठी राखीव दिवस ठेवण्यात आला होता आणि पावसामुळे राखीव दिवशी सामन्याचा निकाल लागला होता. आता सर्वात मोठा प्रश्न हा आहे की: जर क्वालिफायर आणि एलिमिनेटर सामन्यांमध्ये पावसाने हजेरी लावली, तर निकाल कसे ठरतील?

खरं तर, क्वालिफायर–१, एलिमिनेटर किंवा क्वालिफायर–२ मधील कोणताही सामना पावसामुळे रद्द झाल्यास, राखीव दिवसाचा नियम लागू होत नाही. आता प्रश्न असा आहे की विजेता कसा घोषित केला जाईल आणि कोणता संघ पुढे जाईल. अशा परिस्थितीत, मागील फेरीतील गुणतालिकेतील स्थानाला प्राधान्य दिल जात. याचा अर्थ असा की, जर आरसीबी आणि गुजरात यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाला, तर आरसीबीला विजेता घोषित केलं जाईल.एलिमिनेटर: सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स, २७ मे २०२६, न्यू चंदीगड (संध्याकाळी ७ वाजता) क्वालिफायर–२ : क्वालिफायर–१ मधील पराभूत संघ विरुद्ध एलिमिनेटरमधील विजयी संघ, २९ मे २०२६, न्यू चंदीगड (संध्याकाळी ७ वाजता)

## भारतातला सर्वात वेगवान माणूस, १०० मीटर शर्यत अवघ्या १०.०९ सेकंदात केली पूर्ण



मुंबई–शनिवारी गुरिंदरवीर सिंहने राष्ट्रीय सिनियर एथलेटिक्स फेडरेशन स्पर्धेत दुसऱ्या दिवशी एक ऐतिहासिक कामगिरी केली. त्याने पुरुषांच्या १०० मीटर शर्यती जबरदस्त परफॉर्मन्स करून सर्वांना आश्चर्यचकित करून सोडले. गुरिंदरवीर सिंहने १०.०९ सेकंदात १०० मीटर शर्यत पूर्ण करून राष्ट्रीय रेकॉर्ड कायम केला. गुरिंदरवीर सिंहने या सत्रातील आशियातील दुसऱ्या क्रमांकाचा वेगवान वेळ नोंदवला. त्याने प्रतिस्पर्धी अनिमेष कुजूर याला आश्चर्यकारकपणे मागे सोडले. या स्पर्धेत १०० मीटर शर्यतीत सर्वात वेगवान भारतीय धावपटू होण्यासाठी गुरिंदरवीर आणि माजी राष्ट्रीय विक्रमधारक अनिमेश यांच्यातील लढत भारतीय

### कोण आहे गुरिंदरवीर सिंग?

ॲथलेटिक्समध्ये नेहमीच लक्षात राहील. ओडिसाचं प्रतिनिधित्व करणारा अनिमेश याने मागच्यावर्षी १०.१८ सेकंदात १०० मीटर शर्यत पूर्ण केली होती. मात्र यंदाच्या स्पर्धेत शुक्रवारी पहिल्याच दिवशी

२५ वर्षाच्या गुरिंदरवीर सिंहने सेमी फायनलमध्येच १०.१७ सेकंदात १०० मीटर शर्यत पूर्ण केली होती. याच्या पाचच मिनिटांनी अनिमेषने दुसऱ्या सेमी फायनलमध्ये १०.१५ सेकंदात १०० मीटर शर्यत पूर्ण केली. मात्र पुरुषांच्या १०० मीटर शर्यतीत हा रेकॉर्ड गुरिंदरवीर सिंहने १०.०९ सेकंदात शर्यत पूर्ण करून राष्ट्रीय विक्रम रचला.

स्पर्धेत रिलायंस फाउंडेशनचे प्रणव गुरव याने १०.२९ सेकंदांच्याच्या वेळेत १०० मीटर शर्यत पूर्ण करून वेगवान धावपटूंच्या लिस्टमध्ये तिसरं स्थान पटकावलं. गुरिंदरवीरने भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने निश्चित केलेला १०.१६ सेकंदांचा २०२६ राष्ट्रकुल खेळांसाठीचा पात्रता वेळ मागे टाकला. त्याची १०.०९ सेकंदांची वेळ ही, मे महिन्यात १९ वर्षीय जपानी धावपटू फुकुतो कोमुरोने नोंदवलेल्या १०.०८ सेकंदांच्या वेळेनंतर, या हंगामात आतापर्यंत कोणत्याही आशियाई खेळाडूने नोंदवलेली दुसरी सर्वात वेगवान वेळ आहे.

१०० मीटर शर्यतीत सर्वात वेगवान धावण्याचा रेकॉर्ड कोणाच्या नावावर?

पुरुषांमध्ये १०० मीटर शर्यतीचा वर्ल्ड रेकॉर्ड ९.५८ सेकंदांचा असून तो दिग्गज धावपटू उसेन बोल्ट याचा आहे. २००९ मध्ये बर्लिन येथे त्याने वर्ल्ड एथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये कारनामा केला होता.

कोण आहे गुरिंदरवीर सिंह?

गुरिंदरवीर सिंह पंजाबमधून येतात. तो भारताचा एलीट ट्रॅक एंड फिल्ड धावपटू असून त्याला या मोठ्या कामगिरीनंतर फास्टेस्ट मेन इन इंडियन हिस्ट्री हे टायटल मिळाले आहे. तो शॉट स्प्रिंट दौडमध्ये स्पेशलिस्ट आहे. तो आशियायी खेळ आणि कॉमनवेल्थ गेम्ससाठी सुद्धा क्वालिफाय झालाय.

## विराट मागे घेतोय? पुन्हा टीम इंडियातून खेळणार?

मुंबई–एकीकडे यंदाच्या इंडियन प्रिमिअर लीगच्या ग्रुप स्टेजमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ पॉइण्ट्स टेबलवर अव्वल स्थानी असल्याने विराट कोहलीचे चाहते सलग दुसऱ्यांदा आयपीएलची ट्रॉफी जिंकण्याची आशा लावून बसले आहेत. असं असतानाच दुसरीकडे विराटचे बालपणीचे प्रशिक्षक राजकुमार शर्मा यांनी कोहलींच्या चाहत्यांचा आनंद द्विगुणित करणारी किंवा आयपीएलची ट्रॉफी जिंकण्यापेक्षाही महत्त्वाच्या बातमीचे शुभ संकेत दिले आहेत.



लवकरच गुड न्यूज?

विराटला लहानपणी फलंदाजीचे धडे देणाऱ्या राजकुमार शर्मा यांनी विराट कसोटी क्रिकेटमधील निवृत्ती मागे घेऊन पुन्हा अमर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये पुनरागमन करु शकतो असं म्हटलं आहे. यासंदर्भात विराटसोबत काय चर्चा झाली आहे याचा खुलासच शर्मा यांनी केला आहे. ३७ वर्षीय विराटने मागील वर्षीच कसोटी क्रिकेटमधून तडकाफडकी निवृत्ती जाहीर केली होती. तो सध्या केवळ एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत असला तरी हे चित्र लवकरच बदलू शकतं असे संकेत शर्मा यांनी दिले आहेत.

कसोटीमध्ये दयनीय अवस्था–मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये भारतीय संघ कमालीची कामगिरी करत आहे. एकदिवसीय क्रिकेटबरोबरच टी–२० क्रिकेटमध्येही भारतीय संघाचा दबदबा दिसत आहे. मात्र असं असलं तरी याच्या उलट चित्र कसोटीमध्ये आहे. भारताने मायदेशामध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धची मालिका गमावली आहे. २०२४ मध्येही न्यूझीलंडच्या पाहुण्या संघाने भारताला भारताच पाणी पाजलं होतं. यानंतर भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धची 'बॉर्डर–गावस्कर ट्रॉफी' देखील गमावल्याने चांगलीच टीकेची झोड उठली होती.

विराटने परत येण्याची मागणी

कसोटी क्रिकेटमधील या निराशाजनक कामगिरीच्या पार्श्वभूमीवर, अनेक भारतीय क्रिकेट चाहत्यांनी कोहलीने पुन्हा एकदा कसोटी खेळण्याचा विचार देशाच्या भल्यासाठी करावा अशी मागणी केली आहे. कसोटीमध्ये पुनरागमन करुन भारताला या निराशाजनक कामगिरीच्या गर्तेतून कोहलीने बाहेर काढावं अशी अपेक्षा भारतीय क्रिकेट चाहत्यांना आहे. यासंदर्भात राजकुमार शर्मांनाही प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी यासंदर्भात सकारात्मक उत्तर देत चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे.

विराटचे प्रशिक्षक नेमकं काय म्हणाले?

''याबद्दल (विराटने कसोटीमध्ये पुनरागमन करण्याबद्दल) त्याच्याशी बोलणं तर झालं आहे. आता पुढे काय होतं ते पाहूयात,'' असं राजकुमार शर्मा यांनी 'एक्सप्रेस कॅफे' या पॉडकास्टमध्ये विराटच्या पुनरागमनासंदर्भातील प्रश्नाला उत्तर देताना म्हटलं आहे.दमदार कसोटी करिअर

कसोटी क्रिकेटमध्ये भारताच्या सर्वोत्तम – फलंदाजांपैकी एक म्हणून कोहलीचं नाव आवर्जून घेतलं जातं. विराट १२३ कसोटी सामने खेळला असून त्याने ४६.८५ च्या सरासरीने ९२३० धावा केल्या आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये त्याच्या नावावर ३० शतके जमा आहेत. देशातील महान कसोटी कर्णधारांमध्येही विराटची गणना होते. कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधार म्हणून नेतृत्व केलेल्या ६८ कसोटी सामन्यांपैकी ४० सामन्यांमध्ये त्याने भारताला विजय मिळवून दिला आहे. त्यामुळे आता

# सामन्यापूर्वी घराजवळ झालेल्या हल्ल्यानंतर मार्टा कोस्त्युक ढसाढसा रडली

### नंतर सामन्यात मिळवला विजय




नवी दिल्ली –युक्रेनियन टेनिसपटू मार्टा कोस्त्युकने आपल्या फ्रेंच ओपन मोहिमेची सुरुवात अगदी तिथूनच केली, जिथे तिने माद्रिदमध्ये आपला प्रवास थांबवला होता. रविवार, २४ मे रोजी, रोलँड गॅरोस येथील महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत ओक्साना सेलेखमेतेवाला ६–२, ६–३ नं पराभूत करण्यासाठी या युक्रेनियन खेळाडूला अवघ्या १ तास १४ मिनिटांचीच गरज भासली. मात्र, हा विजय कितीही सहज वाटत असला, तरीही कोस्त्युकनं या सामन्याचं वर्णन आपल्या कारकिर्दीतील सर्वात कठीण सामन्यांपैकी एक असं केलं.

सामन्यापूर्वी घराजवळ झाला क्षेपणास्त्र हल्ला : वास्तविक सामन्यापूर्वी रविवारी सकाळी, युक्रेनमध्ये आई–वडील राहत असलेल्या घरापासून अवघ्या १०० मीटर अंतरावर असलेली एक इमारत क्षेपणास्त्राच्या हल्ल्यात उद्ध्वस्त झाल्याचं समजताच, कोस्त्युक पूर्णपणे हादरुन गेली. या २२ वर्षीय कोस्त्युकनं रशियाच्या युक्रेनवरील आक्रमणाविरुद्ध सातत्यानं आवाज उठवला आहे; विशेष म्हणजे, विविध स्पर्धांमध्ये (टूरवर) रशियन आणि बेलारुशियन खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यासही तिनं स्पष्टपणे नकार दिला आहे.

कोर्टवर पाऊल ठेवण्यापूर्वी झाली होती भावूक : कोर्टवर पाऊल ठेवण्यापूर्वी आपल्याला भावूक आणि साशंक वाटत असल्याची कबुली कोस्त्युकनं दिली. तसंच, सकाळचा काही वेळ आपण रडण्यात घालवल्याचंही तिनं सांगितलं. दुसऱ्या फेरीसाठी पात्रता मिळवूनही, आपले विचार आणि हृदय मात्र युक्रेनमधील लोकांसोबतच असल्याचं तिनं म्हटलं.

काय म्हणाली कोस्त्युक : सामन्यानंतर कोस्त्युक म्हणाली, ''आज मला स्वत:चा प्रचंड अभिमान वाटतो आहे. मला वाटतं की, माझ्या कारकिर्दीतील ही सर्वात कठीण सामन्यांपैकी एक लढत होती. आज सकाळीच, माझ्या आई–वडिलांच्या घरापासून अवघ्या १०० मीटर अंतरावर एका क्षेपणास्त्राने (मिसाईलनं) एक इमारत उद्ध्वस्त केली. ती सकाळ अत्यंत कठीण होती. हा सामना माझ्यासाठी कसा ठरेल, याचा मला काहीच अंदाज नव्हता. या परिस्थितीला मी कसं सामोरं जाईन, हे देखील मला ठाऊक नव्हतं. पुढं बोलताना कोस्त्युकनं सांगितलं, ''आज सकाळचा काही वेळ मी रडण्यातच घालवला. आज मला स्वत:बद्दल काहीही बोलायचं नाही. स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केल्याचा मला खूप आनंद आहे; परंतु आज माझे सर्व विचार आणि माझे संपूर्ण हृदय हे युक्रेनच्या जनतेसोबत आहे.'' तसंच इथं उपस्थित राहिल्याबद्दल तुम्हा सर्वांचे खूप खूप आभार, असं कोस्त्युकनं पुढं नमूद केलं.सामन्यात कोस्त्युकचं सेलेखमेतेवावर वर्चस्व : क्ले कोर्टवरील हंगामाच्या सुरुवातीलाच 'मॅड्रिड ओपन' आणि 'रुएन' स्पर्धांची विजेती ठरल्यामुळं, कोस्त्युक अत्यंत बहारदार फॉर्ममध्ये या स्पर्धेत दाखल झाली होती. पॅरिसमध्ये १५वं मानांकन मिळालेल्या कोस्त्युकनं, आक्रमक 'बेस–लाइन हिटिंग' आणि उत्कृष्ट 'रिटर्निंग'च्या जोरावर सामन्यावर सुरुवातीपासूनच पूर्ण नियंत्रण मिळवलं. दुसरीकडे, सेलेखमेतेवाला संपूर्ण सामन्यादरम्यान आपल्या 'सर्व्हिस'वर प्रचंड संघर्ष करावा लागला; तिनं अनेक 'डबल फॉल्ट्स' केले आणि कोस्त्युकनं निर्माण केलेल्या सततच्या दबावाचा सामना करण्यात ती पूर्णपणे अपयशी ठरली.दुसऱ्या फेरीत कोणाशी होणार सामना : पहिला सेट केवळ ३६ मिनिटांतच कोस्त्युकनं ६–२ नं जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये सेलेखमेतेवानं पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला असला तरी, युक्रेनियन खेळाडूनं आपला संयम राखला आणि महत्त्वाच्या क्षणी सर्व्हिस ब्रेक करुन सामना सहजपणे जिंकला. कोस्त्युकनं खेळल्या गेलेल्या एकूण गुणांपैकी जवळपास ६० टक्के गुण जिंकले आणि रिटर्नवर वर्चस्व गाजवत आपल्या १३ ब्रेक–पॉइंट संधींपैकी सहा संधींचं रुपांतर गुणांमध्ये केले. कोस्त्युकच्या प्रभावी कामगिरीमुळं ती या वर्षीच्या फ्रेंच ओपनमधील अनपेक्षित विजेत्यांपैकी एक बनली आहे. दुसऱ्या फेरीत तिचा सामना केटी व्होलिनेट्स किंवा क्लारा बुरेल यांच्यापैकी एकाशी होईल.



## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथे सॉफ्टवेअर प्रणालीचा प्रभावी वापर या विषयावर प्रशिक्षण उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री), लातूर येथे आयक्यूएसी अंतर्गत व्हिएमइडूलाईफ सॉफ्टवेअर द्वारे कार्यालयीन आणि शैक्षणिक कामकाजासाठी स्मार्ट प्रशासन आणि ई-गव्हर्नन्स ची प्रभावी अंमलबजावणी; या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम व्हिएमइडूलाईफ सॉफ्टवेअर सर्व्हिसेस, पुणे येथील तांत्रिक तज्ज्ञ श्री. रजत मोरे यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश टेकाडे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. तद्नंतर आयक्यूएसी समन्वयक डॉ. अनंत देशपांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले, या प्रसंगी त्यांनी सध्याच्या युगात महाविद्यालयीन कार्यालय आणि विविध विभागीय कामकाजात सॉफ्टवेअर प्रणालीचे महत्त्व अधोरेखित करत अद्ययावत राहणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्धाटन प्रसंगी नॅक समन्वयक डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. अविनाश मठपती, कार्यालयीन अधीक्षक श्री. शिवहर विभूते, विभाग प्रमुख, शिक्षक्त आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात व्हिएमइडूलाईफ तांत्रिक विशेषज्ञ श्री. रजत मोरे यांनी ग्रंथालय व्यवस्थापन, आवक-जावक विभाग, ओळखपत्र निर्मिती, संकेतस्थळ एकत्रीकरण तसेच साठा व्यवस्थापन अशा विविध मॉड्यूल्स मधील अद्यावत केलेले बदल आणि त्याचा प्रभावी वापर याबाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले संबंधित विभागांचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांच्या शंकांचे समाधान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती बिद्री यांनी केले, तर प्रा. अविनाश मठपती यांनी आभारप्रदर्शन केले. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. महेश मानके, प्रा. रोहित कोंबडे, प्रा. वसीम काझी, प्रा. दीक्षा विभूते, प्रा. पल्लवी गंदीगुडे, डॉ. गणेश गिरी, अक्षय खंडापुरे, दर्शन भोसगेकर, शालिनी पन्हाळे, गणेश जाधव तसेच महाविद्यालयातील इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून हा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी केला.

## स्वातंत्र्यसेनानी भिवाजी शिंदे यांच्या पत्नी काविराबाई शिंदे यांचे वयाच्या १०२ व्या वर्षी निधन



**निलंगा/प्रतिनिधी :** निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु.) येथील स्वातंत्र्यसेनानी दिवंगत भिवाजी शिंदे यांच्या पत्नी काविराबाई भिवाजी शिंदे (वय १०२ वर्ष) यांचे सोमवार दि. २५ मे रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने अंबुलगा परिसरासह संपूर्ण निलंगा तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

काविराबाई शिंदे यांनी आपल्या आयुष्याची शतकी खेळी पूर्ण केली होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी स्वातंत्र्यसेनानी भिवाजी शिंदे यांना खंबीर साथ दिली. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्या ज्येष्ठ समाजवादी नेते शिवाजीराव शिंदे व अंबुलगा बु. चे माजी सरपंच सुभाष शिंदे यांच्या मातोश्री होत.

स्व. काविराबाई शिंदे यांच्या पार्थिवावर आज, मंगळवार दि. २६ मे रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या स्वतःच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील विविध मान्यवरांनी दुःख व्यक्त करत शिंदे कुटुंबियांचे सांत्वन केले आहे.

## निलंगा तालुक्यातील हरीजवळगा,माळेगाव व भूतमुगळी या गावी मनसेच्या शाखांचे उदघाटन



**निलंगा (प्रतिनिधी):** निलंगा तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पक्षवाढीच्या दृष्टीने अनेक गावी प्रदेश सरचिटणीस संतोष भाऊ नागरगोजे यांच्या हस्ते शाखाउद्घाटने करण्यात येत आहेत ज्यात काल हरी जवळगा, कल्याणी माळेगाव व भुतमुगळी या गावी मनसे शाखांचे उद्धाटन उत्साहात करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने,निलंगा तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. या उद्धाटन प्रसंगी संतोषभाऊ नागरगोजे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची भूमिका,धोरणे व युवकांनी संघटन मजबूत करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.तसेच यावेळी स्थानिक पातळीवरील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. आगामी काळात गावागावात मनसेची संघटना अधिक मजबूत करून जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढा देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.या प्रसंगी शेतकरी सेना तालुका अध्यक्ष सदाशिव हाडोळे, तालुका उपाध्यक्ष बालाजी पवार, शिवराज चिंचोळे, हरी जवळगा उपसरपंच शंकर हाडोळे,हरी जवळगा

**शाखा:-** शाखा कार्यअध्यक्ष प्रदीप हाडोळे,शाखा अध्यक्ष,ज्ञानेश्वर चांदुरे

शाखा उपाध्यक्ष, तुकाराम मुगळे, शाखा उपाध्यक्ष:- शुभम तांबोळे,शाखा सचिव विशाल बिराजदार

**कल्याणी माळेगांव शाखा:-**

शाखा कार्याध्यक्ष राहुल चौधरी,शाखा अध्यक्ष सचिन साठे,शाखा उपाध्यक्ष नागेश साठे,पाटील,भुतमुगळी शाखा

शाखा अध्यक्ष लखन भालके,शाखा कार्याध्यक्ष रणजीत सोळंके,शाखा उपाध्यक्ष चंद्रकांत सावंत

शाखा उपाध्यक्ष ओमराजे नेलवाडे, शाखा सचिव शकील शेख आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# आ.अमित देशमुख यांची परमपूज्य राष्ट्रसंत श्री. मोरारी बापूंच्या रामकथेस उपस्थिती

**लातूर प्रतिनिधी:** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळातील काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी औसा तालुक्यातील किल्लारी येथील निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या प्रांगणात आयोजित परमपूज्य राष्ट्रसंत श्री. मोरारी बापू यांच्या रामकथेस उपस्थिती दर्शवली.

ईश्वरप्रसाद डागा आणि ओमप्रकाश डागा यांनी आयोजित केलेल्या या रामकथेचा आमदार अमित देशमुख यांनी सुमधूर वाणीतून लाभ घेतला. त्यानंतर त्यांनी प्रभू श्रीरामाची आरती केली आणि महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, शैलेश पाटील चाकूरकर, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, ईश्वरप्रसाद डागा, ओमप्रकाश डागा, 'ट्वेंटीवन शुगर्स'चे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, हुकूमचंद कलंत्री, राजेंद्र मालपाणी, चंद्रकांत बलदवा, किल्लारीचे जिल्हा परिषद सदस्य सुभाष पवार,





औसा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण बाबळसुरे, बालाप्रसाद बिदादा, संतोष तोष्णीवाल, राजेश्वर बुके, बळवंत पाटील, ड. बाबासाहेब गायकवाड, हमीद शेख, डॉ. अरविंद भातांबरे, प्रकाश मिरगे, वागंबर कांबळे, चक्रधर शेळके यांच्यासह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने श्रीराम भक्त उपस्थित होते.

# ऊस उत्पादकांना आनंदाची बातमी

### मांजरा परिवारातील साखर कारखान्याकडून लोकनेते विलासराव देशमुख यांच्या जयंती निमित्ताने १०० रुपयांचा हप्ता उस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा





**लातूर/प्रतिनिधी :** राज्यात नावलौकिक असलेल्या मांजरा परिवारातील सर्व कारखान्यानी लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या ८१ व्या जयंतीनिमित्त उस उत्पादक शेतकरी सभासद यांना ऊसदरा पोटी १००/ चा हप्ता खात्यावर वर्ग केला असून परिवारातील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखाना, रेणा साखर कारखाना, विलास साखर युनिट १, युनिट २, जागृति शुगर तळेगाव, संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखाना,मांजरा शुगर्स मंगरूळ या साखर कारखान्याचा समावेश आहे यापूर्वी या सर्व साखर कारखान्याकडून २७५०/ रुपये प्रति टन देण्यात आले असून एकूण २८५०/ उर्वरित रक्कम लवकरच अदा करण्यात येणार असल्याचे कारखाना प्रशासनाकडून कळवण्यात आले आहे सध्या शेतकऱ्यांना शेतीतील उन्हाळी कामे व ऊस पीक खतासाठी शेतकऱ्यांना मदत व्हावी यासाठी लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या जयंती निमित्ताने शेतकऱ्यांचा खात्यावर १०० रुपयांचा हप्ता जमा करण्यात आलेला असून ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांनी नजीकच्या बँकेतून रक्कम घ्यावी असे आवाहन मांजरा परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवपुर येथे गोठ्याला आग लागून दोन म्हशी ठार



**अजगर मजकुरी/नळेगाव:** मौजे शिवपुर तालुका शिरूर अनंतपाळ येथील शेतकरी सौ सुमित्रा राजेंद्र तेलंगे यांच्या शेतातील गोठ्याला आग लागून दोन लाखाचे नुकसान एक वगार दोन म्हशी जळून जागेवर ठार व शेतातील इतर साहित्य जळाले असून शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे शासनाकडून मदत मिळावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे याबाबत तलाठी कुरुडे साहेब ग्रामसेवक पूजा वाघमारे यांनी घटनास्थळी पंचनामा केला आहे शिरूर अनंतपाळ तालुक्याचे सभापती संजय हरिश्चंद्र सूर्यवंशी यांनी घटनास्थळी भेट देऊन शेतकऱ्यास शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

# लातूर येथे निवृत्तीवेतनधारक आणि आहरण व संवितरण अधिकाऱ्यांसाठी पेन्शन अदालत, कार्यशाळा उत्साहात

### महालेखाकार नागपूर व जिल्हा कोषागार कार्यालय लातूरचा संयुक्त उपक्रम


**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख आणि त्यांच्या अधिपत्याखालील निवृत्तीवेतनधारकांच्या अडीअडचणींचे निवारण करण्यासाठी आज लातूर येथे विशेष कार्यशाळा आणि पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. नागपूर महालेखाकार आणि लातूर जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील डीपीडीसी हॉलमध्ये या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यशाळेत नागपूर महालेखापाल कार्यालयाचे वरिष्ठ लेखाधिकारी मैथिली जगन्नाथन, सहायक लेखाधिकारी चेतनकुमार गुप्ता आणि लेखापाल समिर मीना यांनी उपस्थित सर्व कार्यालय प्रमुखांना निवृत्ती वेतन प्रकरणे (पेंशन पेपर्स) अत्यंत अचूकपणे कसे सादर करावेत, याबाबत सविस्तर व तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच निवृत्तीवेतनधारकांना येणाऱ्या विविध अडचणी व समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत त्यांचे जागेवरच निराकरण केले.

या बैठकीला लातूर जिल्हा कोषागार कार्यालयाच्या जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला भा. पाटील, अप्पर कोषागार अधिकारी ख.नै. खोजे, मा.रो. गुट्टे आणि ना. ए. बुध्दिवंत प्रामुख्याने उपस्थित होते. या पेन्शन अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी आर. डी. माने, स्वामी एस.एस., कुलकर्णी ए.डी., एस.व्ही. बिराजदार, ब.म.पांचाळ, अ.द.सिरसाट आणि नामदेव कोकरे यांनी परिश्रम घेतले. कार्यशाळेला जिल्ह्यातील बहुसंख्येने कार्यालय प्रमुख, आहरण व संवितरण अधिकारी आणि निवृत्तीवेतनधारक उपस्थित होते.

## पद्मभूषण पं.अजयजी चक्रवर्ती यांना स्वरतालयोगी पं.गोविंदराव बोरगावकर स्मृती पुरस्कार जाहीर



**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री ज्ञानसरस्वती मंदिर संस्थान आणि सरस्वती संगीत महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने अभिजात शास्त्रीय संगीत क्षेत्रात विशेष उल्लेखनीय योगदान देणारे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुप्रसिद्ध गायक पद्मभूषण पं.अजयजी चक्रवर्ती (कोलकत्ता) यांना गुरुवर्य स्वरतालयोगी पं.गोविंदराव बोरगावकर स्मृती पुरस्कार जाहीर झाला असून दयानंद सभागृह,लातूर याठिकाणी शनिवार दि. ३० मे २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना सन्मानित केले जाणार आहे. एक लाख रुपये रोख रक्कम, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह व शाल ,श्रीफळ हे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

याप्रसंगी पद्मभूषण पं. अजयजी चक्रवर्ती (कोलकत्ता) यांचे शास्त्रीय गायन ऐकण्याची सुवर्णसंधी लातूरकरांना लाभणार आहे. यावेळी सरस्वती बोरगावकर - शीलवंत (बिदर) यांचेही गायन संपन्न होणार आहे. त्यांना हार्मोनियम साथ पं. अजय जोगळेकर, तानपुरा साथ श्री. मेहेर परळीकर, तबला साथ श्री. स्वप्नील भिसे करणार आहेत.

लातूरकर रसिक श्रोत्यांनी या संगीत समारोहाप्रसंगी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून सहभागी कलावंतांच्या कलाविष्काराचा आस्वाद घ्यावा असे आवाहन आयोजक तालमणी डॉ. राम बोरगावकर, सौ.मधुवंती बोरगावकर - देशमुख (पुणे), सुरमणी पं. बाबुराव बोरगावकर व बोरगावकर संगीत परिवार यांनी केले आहे.



# सोलापूर विभागातील टीटीईंसाठी विशेष अग्निसुरक्षा परिसंवाद; आपत्कालीन प्रतिसाद क्षमता अधिक सक्षम करण्यावर भर

**सोलापूर/प्रतिनिधी :** रेल्वे प्रवासादरम्यान सुरक्षितता अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातर्फे २३ मे २०२६ रोजी सोलापूर स्थानकावर ट्रॅव्हलिंग तिकीट परीक्षक (टीटीई) यांच्यासाठी विशेष सुरक्षा परिसंवाद व अग्निशामक यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. रेल्वेतील आपत्कालीन परिस्थितींमध्ये टीटीईंची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने त्यांना प्रथम प्रतिसाद देणारे कर्मचारी म्हणून अधिक सक्षम करण्यावर या उपक्रमात भर देण्यात आला.

या विशेष अग्निसुरक्षा व आपत्कालीन प्रतिसाद प्रशिक्षण सत्रात टीटीईंना रेल्वे गाड्या व स्थानक परिसरात उद्भवणाऱ्या आगसदृश घटनांना तातडीने व प्रभावीपणे कसे सामोरे जायचे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः आग विझविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या डीसीपी (ड्राय केमिकल पावडर) व सीओ× (कार्बन डायऑक्साइड) प्रकारातील अग्निशामक यंत्रांची वर्गवारी, त्यांचा वापर व उपयुक्तता याविषयी माहिती देण्यात आली.

परिसंवादात क्लास ए, बी, सी, डी आणि एफ प्रकारच्या आगींची माहिती तसेच प्रत्येक प्रकारच्या आगीसाठी योग्य अग्निशमन पद्धतींबाबत जनजागृती करण्यात आली. याशिवाय अग्निशामक यंत्रांचे सुरक्षित हाताळणी तंत्र, वापराची पद्धत आणि आपत्कालीन परिस्थितीत त्यांचा प्रभावी वापर कसा करावा, याचे मार्गदर्शन करण्यात आले. कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी अग्निशामक यंत्रांच्या वापराचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले.

रेल्वे गाड्या व स्थानकांमध्ये उपलब्ध असलेल्या अग्निशमन उपकरणांचा वापर, गाडीत आग लागल्यास सुरुवातीला कोणती उपाययोजना करावी, कोणती खबरदारी घ्यावी, याबाबत सखोल प्रशिक्षण देण्यात आले. धूर अथवा आग लागल्याच्या घटना त्वरित संबंधित रेल्वे नियंत्रण कार्यालय व अधिकाऱ्यांना कळविण्याचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आपत्कालीन स्थलांतर (इव्हॅक्युएशन), गर्दी नियंत्रण आणि अशा प्रसंगी प्रवाशांना सुरक्षितपणे मार्गदर्शन करण्यासंदर्भात विशेष सूचना देण्यात आल्या. ड्युटीदरम्यान सतर्कता राखणे, अग्निशमन उपकरणांची योग्य माहिती ठेवणे तसेच रेल्वे गाड्या व स्थानक परिसरात ज्वलनशील व धोकादायक वस्तू वाहून नेण्यास प्रतिबंध करण्याबाबतही समुपदेशन करण्यात आले. यासोबतच विद्युत आगींचे धोके व त्यावरील प्रतिबंधात्मक उपायांबाबत जनजागृती करण्यात आली.यावेळी सुरक्षा विभागातर्फे एफएसडीएस (फायर अँड स्मोक डिटेक्शन सिस्टीम), एसीपी (अलार्म चेन पुलिंग) आणि एफआयबीए (फेल्युअर इंडिकेशन कम ब्रेक ॲप्लिकेशन) प्रणालींच्या आयसोलेशन प्रक्रियेबाबत विशेष प्रात्यक्षिक व्हिडिओही दाखविण्यात आला. तसेच धावत्या रेल्वेमध्ये विविध व्हॉल्व्हचे संचालन आणि आपत्कालीन यंत्रणा हाताळण्यासंदर्भातील माहिती सहभागी टीटीईंसाठी अत्यंत उपयुक्त ठरली.परस्परसंवादी स्वरूपात झालेल्या या सत्रात सुरक्षा समुपदेशकांनी कर्मचाऱ्यांच्या शंका व प्रश्नांचे संयमाने निरसन करत प्रत्यक्ष परिस्थितीत उपयुक्त ठरणारे मार्गदर्शन केले.

सोलापूर विभागाकडून अशा सक्रिय उपक्रमांच्या माध्यमातून रेल्वेच्या अग्रपंक्तीतील कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षा जनजागृती आणि कार्यक्षम आपत्कालीन तयारी अधिक मजबूत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून, त्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता आणि आपत्कालीन परिस्थितींना त्वरित प्रतिसाद देण्याची क्षमता अधिक प्रभावी होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKHKAUSAR BEGUM SALIM TO: KAUSARBI SALIM SHAIKH
Hence for this Declaration i will be known by this name and will use KAUSARBI SALIM SHAIKH I in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- SHAIKH KAUSAR BEGUM SALIM
NEW NAME :- KAUSARBI SALIM SHAIKH
Address - Hatti Gall Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar no.: 577688299872
Mob.no.: 8208912280

**Name of change Declaration**
Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : SHAIKH YUNUS SALEEM TO: YUNUS SALIM SHAIKH
Hence for this Declaration i will be known by this name and will use YUNUS SALIM SHAIKH I in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- SHAIKH YUNUS SALEEM
NEW NAME :- YUNUS SALIM SHAIKH
Address - Hatti Gall Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar no.: 628123849304
Mob.no.: 8208912280

# इंधनाअभावी शेतकऱ्यांची कामे थांबू नयेत; सुलभ पुरवठ्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करा!

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचे लातूर जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**लातूर/ प्रतिनिधी:** सोमवार, २५ मे २०२६ सध्या सर्वत्र सुरू असलेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर, खरीप हंगामाच्या पूर्वतयारीची व बागायती शेतीच्या मशागतीची कामे इंधनाअभावी थांबू नयेत, यासाठी शेतकऱ्यांना सुलभतेने पेट्रोल व डिझेलचा पुरवठा करण्यात यावा; तसेच गरज पडल्यास शेतकऱ्यांसाठी इंधन पुरवठ्याची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करावी, अशी आग्रही मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी आज सोमवार, दि. २५ मे रोजी लातूरचे जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांना पत्र पाठवून तातडीने पावले उचलण्याची विनंती केली आहे.

शेतकरी बांधवाकडून खरीप हंगामाच्या तयारीची तसेच ऊस व बागायती शेतीच्या मशागतीची सध्या कामे सुरु आहेत. शेती मशागतीच्या या कामासाठी ट्रॅक्टर तसेच ईतर वाहनांचा व तांत्रीक अवजारांचा वापर करण्यात येतो आहे. यासाठी पेट्रोल / डिझेलची या इंधनाची नितांत आवश्यकता भासते आहे या अनुषंगाने माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी लातूर जिल्हा अधिकारी भारत बास्टेवाड यांना पत्र पाठवले आहे.

या पत्रात माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी इंधन टंचाईची सर्वत्र चर्चा सुरु असताना अनेक पेट्रोल पंपावर गाड्यांच्या रांगा लागल्याचे दिसून येत आहे. याठिकाणी शेती मशागतीच्या यंत्रासाठी लागणारे पेट्रोल/डिझेल घेऊन जाण्यासाठी शेतकरी कॅन / बॅरल घेऊन येत आहेत. या शेतक्ययांना काही पेट्रोल पंपावर इंधन नाकारले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. इंधन पुरवठ्यात अडचणी येत असल्यामुळे अनेक ठिकाणी पेट्रोल/डिझेलची टंचाई भासत आहे ही वस्तुस्थिती आहे. हे जरी खरे असले तरी सद्यस्थितीत शेतीची कामेही होणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकयांनाही शेती कामासाठी इंधन उपलब्ध होणे आवश्यक आहे.

तसेच शेतकऱ्यांची समस्या, अडचण आणि त्यांची गरज लक्षात घेऊन, त्यांना सुलभ पद्धतीने आवश्यकतेनुसार पेट्रोल/ डिझेल उपलब्ध करुन देण्यासंदर्भात लातूर जिल्ह्यातील सर्व पेट्रोल-डिझेल पंप धारकांना आपल्या स्तरावरुन सुचना देण्यात याव्यात. शेती कामासाठी इंधन उपलब्ध करुन देण्यासंदर्भात वेगळी व्यवस्था निर्माण करता येते का हेही पहावे. एकाही शेतकऱ्याची शेती कामे इंधनाअभावी रखडली जाऊ नयेत याची दक्षता घ्यावी, अशी विनंती या पत्राद्वारे आमदार अमित देशमुख यांनी जिल्हाधिकारी यांना केली आहे.

# महाराणा प्रतापसिंहांचे कार्य प्रेरणादायी: बसवंतपूर येथील जयंती महोत्सवात विक्रमसिंग चौहान यांचे प्रतिपादन

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूर राजपूत समाज बसवंतपूरच्या वतीने रविवार, २४ मे रोजी महाराणा प्रतापसिंह यांची ४८६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूरचे माजी नगराध्यक्ष विक्रमसिंग चौहान होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मंचावर प्रमुख पाहुणे पृथ्वीसिंग बायस, शिवसिंग सिसोदिया, ड. सुनैना बायस (ठाकूर), सदाशिव गव्हाणे, वीरेंद्रसिंग चौहान, लक्ष्मणसिंग ठाकूर, संतोष ठाकूर, सरपंच पवन जाधव, उपसरपंच राजू रणखांब पाटील आदी उपस्थित होते. यावेळी राधिका राजपूत या चिमुकलीने महाराणा प्रताप यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे मनोगत व्यक्त करत उपस्थितांची मने जिंकली, तर बशीर शेख यांनी कवितेतून इतिहास उलगडला. सरपंच पवन जाधव यांनी राजपूत समाजाच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. यावेळी मनपा परिवहन समितीचे सदस्य संतोषसिंग ठाकूर व वीरेंद्रसिंग चौहान यांचा सत्कार करण्यात आला. पूर्णाकृती पुतळ्यासाठी प्रयत्न गरजेचे वीर महाराणा प्रताप हे सर्वांचे राजे होते. त्यांचा उज्ज्वल इतिहास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. महाराणा प्रताप यांचा लातूर शहरात पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी सर्वस्तरातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. लातूर शहरात महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या उत्साहात सुरू करण्याचा मनोदय आहे.

– विक्रमसिंह चौहान, माजी नगराध्यक्ष

# रेणा कडुन गाळपास आलेल्या ऊसाला प्रती मे.टन रु.१००/- प्रमाणे दुसरा हप्ता खात्यावर जमा

**रेणापूर/प्रतिनिधी:** राज्यभर नावलौकिक असलेला रेणापूर तालुक्यातील रेणा सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम २०२५-२६ यशस्वीपणे संपन्न झाला असुन कारखान्याने गळीत हंगामामध्ये ५६८०८८ मे.टन गाळप करत ५७८२०० क्विं. साखरेचे उत्पादन केले असुन ज्युस सिरप व बी हेवीसह सरासरी साखर उतारा १२.२१ टक्के प्राप्त झाला आहे. सद्या डिस्टलरी प्रकल्प सुरु असुन यापासुन इथेनॉलचे उत्पादन सुरु आहे. इथेनॉल कारखान्याचे नियोजनानुसार पुर्णत्वास येत आहे.

रेणा सहकारी साखर कारखान्याने यापुर्वी पहीला हप्ता रु. २७५०/- प्रति मे.टन याप्रमाणे अदा केलेला आहे. उन्हाळी कामे व ऊस पिक खतासाठी शेतकऱ्यांना मदत व्हावी यादृष्टीने गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देय एफ.आर.पी.पैकी प्रति मे.टन रु.१००/- याप्रमाणे दि.२५/०५/२०२६ रोजी ऊस बिल ऊस पुरवठादारांच्या खात्यावर जमा करीत आहे.

तरी ज्या ऊस पुरवठादारांचा गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये ऊस कारखान्यास गाळपास आला आहे त्यांनी आपल्या संबधीत बँक शाखेशी संपर्क करावा असे कारखाना प्रशासनाने कळविले आहे.

# पाण्याअभावी सुकली झाडे

**लातूर/प्रतिनिधी:** शहरातील बार्शी रस्त्यावरीलगांधी चौक ते पाच नंबर चौकादरम्यान विविध ठिकाणी दुभाजकातील झाडे पाण्याअभावी सुकून गेली आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते संविधान चौकादरम्यान असलेली दुभाजकातील शोभेची झाडे शेवटची घटका मोजत आहेत. या झाडांना वाचविण्यासाठी पाणी द्यावे, अशी मागणी वृक्षप्रेमीतून होत आहे. सध्या तापमानाचा पारा चाळीशीपार गेला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस झाडांना गरजेपुरते पाणी देण्याची व्यवस्था करण्याची मागणी होत आहे.

# 'लातूर पॅटर्न' बदनाम करण्याचे षड्यंत्र

## उद्योग विभागाच्या तुघलकी नोटिसीची होळी करत काँग्रेस व कृती समितीचा एल्गार!

**लातूर/ प्रतिनिधी:** नीट पेपर फुटी प्रकरणाच्या नावाखाली संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या 'लातूर पॅटर्न'ला जाणीवपूर्वक टार्गेट केले जात असल्याचा आरोप करत आज लातूरमध्ये प्रचंड संताप व्यक्त करण्यात आला. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटी आणि 'लातूर पॅटर्न बचाव कृती समिती' यांच्या वतीने आज लातूर अर्बन बँक उद्योग भवन समोर प्रशासनाच्या जाचक नोटिसीचे जाहीर दहन करून तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. या वेळी आंदोलकांनी लातूरच्या शैक्षणिक अस्मितेशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, असा थेट इशारा प्रशासनाला दिला.

लातूर येथील जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी २२ मे २०२६ रोजी एक वादग्रस्त नोटीस (जा.क्र.जिउकेला/सऔव/२०२६/८२१) जारी केली आहे. या आदेशान्वये, लातूर इंडस्ट्रियल इस्टेट (औद्योगिक वसाहत) मधील मूळ कराराचा भंग करून उत्पादन व्यतिरिक्त सुरू असलेले सर्व पूरक व्यवसाय, जसे की ट्यूशन क्लासेस, कोचिंग क्लासेस, शिकवणी वर्ग, हॉस्टेल, खानावळ, वस्तीगृह आणि अभ्यासिका हे तातडीने आणि सरसकट बंद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या फर्मानामुळे लातूरच्या ट्यूशन एरियात शिकणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### आमचे टॅलेंट जुने आहे, म्हणून लातूर पॅटर्न बावन्नकशी सोने आहे!

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना प्रशासकीय कारवाईवर आणि भाजपवर घणाघाती आरोप केले. ते म्हणाले मोठ्या कष्टाने आणि अनेकांच्या बलिदानातून 'लातूर पॅटर्न'चे हे बावन्नकशी सोने उभे राहिले आहे. हा पॅटर्न कोणाच्या उपकाराने नाही, तर जनमानसात रुजलेला आहे. आमचे टॅलेंट जुने आणि सिद्ध झालेले आहे, त्यामुळे ते कोणालाही बदनाम करता येणार नाही. या नीट पेपर फुटी प्रकरणाच्या आड लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे मोठे षड्यंत्र रचले जात आहे.

यावेळी अभय साळुंके यांनी संताप व्यक्त करताना सांगितले की, येत्या २१ जून रोजी विद्यार्थ्यांची महत्त्वाची परीक्षा आहे. आधीच विद्यार्थी आणि पालक प्रचंड मानसिक तणावाखाली आहेत.अशा ऐन परीक्षेच्या काळात तुम्ही थेट क्लासेस, हॉस्टेल्स आणि अभ्यासिका बंद करण्याचे आदेश काढून विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडत आहात का? केवळ राजकीय आकसापोटी आणि कोणाच्या तरी सांगण्यावरून प्रशासनाने झोपेतून उठल्यासारखा हा तुघलकी अध्यादेश कसा काढला? इथे कायद्याचे राज्य आहे की हुकूमशाही? असा सवालही आंदोलकांनी केला.

अशाच प्रकारच्या अटक आणि गैरप्रकार पुण्यातही समोर आले आहेत. पण पुण्यात घटना घडली की ती 'त्या पर्टिक्युलर प्राध्यापकाची किंवा शिक्षकाची चूक' ठरते. मात्र लातूरमध्ये काही झाले की थेट संपूर्ण 'लातूर पॅटर्न'च चुकीचा, असा प्रचार केला जातो. हा दुजाभाव आणि मग्रुरी आम्ही कदापि सहन करणार नाही. कृती समितीने स्पष्ट केले की, ते कोणत्याही गुन्हेगाराच्या पाठीशी उभे राहिलेले नाहीत. त्यांची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले: नीट पेपर फुटी प्रकरणात जे कोणी दोषी आढळतील, मग ते डॉक्टर असोत, मोटेगावकर असोत किंवा पी. व्ही. कुलकर्णी असोत; चौकशीअंती ते दोषी सिद्ध झाल्यास त्यांना भरचौकात फाशी द्या! २३ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या एकालाही सोडू नका, आमचा त्याला पाठिंबाच असेल.

परंतु, याच्या आडून ६३ च्या ६३ प्लॉट धारकांना सरसकट नोटीस देणे चुकीचे आहे. प्रशासनाने प्रत्येकाला वैयक्तिक सुनावणीची संधी द्यावी, त्यांची केस समजून घ्यावी आणि मगच कायदेशीर कारवाई करावी. असा हुकूमशाही पद्धतीने ट्यूशन एरिया बंद पाडण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र संघर्ष केला जाईल.

### अन् आंदोलकांनी पेटवून दिली नोटीस...

उद्योग भवन परिसरात जमा झालेल्या शेकडो आंदोलकांनी आणि काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. प्रशासनाचा निषेध नोंदवण्यासाठी आंदोलकांनी अधिकृत पत्राच्या प्रतींची होळी केली. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आंदोलनात लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.डॉ. शिवाजी जवळगेकर, उपमहापौर स्नेहल उटगे,ड. किरण जाधव, विष्णुदास धायगुडे, प्रवीण सूर्यवंशी, कैलास कांबळे, प्रवीण कांबळे,विजय जाधव, विकास कदम,संतोष शिंदे,पवार सर,पाटील कदम,मिरकले सर,पी. व्ही. विवेकानंद,संतोष धायगुडे ,चंद्रकांत बिडवे,बाळासाहेब कदम,पी. एस. जाधव तसेच लातूरमधील शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर, विद्यार्थी, पालक आणि काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# लातूरमध्ये रंगणार कुस्तीचा महासंग्राम; 'श्री शंभू-बस्व-राणा जयंती'निमित्त विर योद्धा संघटनेकडुन भव्य स्पर्धेचे आयोजन!

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्राच्या परंपरागत मातीतील ताकद, जिद्द आणि शौर्य यांचा थरार पुन्हा एकदा लातूरकरांना अनुभवता येणार आहे. 'वीर योद्धा संघटना' आयोजित श्री शंभू-बस्व-राणा जयंती महोत्सव २०२६ अंतर्गत भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हा महासंग्राम मंगळवार, दिनांक २६ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे रंगणार आहे.

विभागीय मल्लांमध्ये रंगणार सामने: महाराष्ट्राची गौरवशाली कुस्ती परंपरा जपण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत लातूर, धाराशिव आणि नांदेड विभागातील नामांकित व तगडे मल्ल आपले नशीब आजमावण्यासाठी आखाड्यात उतरणार आहेत. विविध वजन गटांमध्ये या लढती पार पडणार असून, विजेत्या मल्लांवर आकर्षक बक्षिसांचा वर्षाव केला जाणार आहे.

आकर्षक बक्षिसे आणि रोख रक्कम: खेळाडूंच्या कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजकांनी जय्यत तयारी केली आहे. या स्पर्धेत प्रथम पारितोषिकापासून ते चतुर्थ पारितोषिकापर्यंत भरघोस रोख रक्कम आणि आकर्षक बक्षिसे देऊन मल्लांचा गौरव करण्यात येणार आहे.

# दयानंदचे नाव पोर्टलवर; विद्यार्थ्यांना दिलासा...!

## प्रवेशाची मुदत वाढवण्याचे निर्देश: अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

**लातूर/प्रतिनिधी:** शिक्षण विभागाच्या तांत्रिक चुकीमुळे ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीतून गायब झालेल्या लातूर आणि धाराशिव येथील नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलासा दिला आहे.या महाविद्यालयांची नावे तात्काळ पोर्टलवर समाविष्ट करून विद्यार्थ्यांना पर्याय निवडण्यासाठी मुदत वाढवून देण्याचे निर्देश न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.

न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांच्या सुट्टीकालीन खंडपीठाने २५ मे २०२६ रोजी हा महत्त्वपूर्ण आदेश दिला.राज्यभरात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी ११ वीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. २१ मे २०२६ पासून पहिल्या फेरीसाठी कॉलेजांचे पर्याय निवडण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, अधिकृत पोर्टलवर लातूरचे दयानंद विज्ञान महाविद्यालय, तसेच धाराशिव जिल्ह्यातील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर ज्युनिअर कॉलेज (कळंब) आणि रामकृष्ण परमहंस कॉलेज या नामांकित संस्थांची नावेच उपलब्ध नव्हती. या प्रकारामुळे हजारो विद्यार्थी आणि संस्थाचालकांमध्ये गोंधळ उडाला होता. शिक्षण उपसंचालकांकडे चकरा मारूनही तांत्रिक चूक सुधारली न गेल्याने, शेवटी महाविद्यालयांनी उच्च न्यायालयात धाव घेत रिट याचिका दाखल केल्या होत्या.

### महाविद्यालयांची नावे आता पोर्टलवर..!

याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ आर. एस. देशमुख यांनी न्यायालयात बाजू मांडली. सुनावणी दरम्यान, सरकारी वकील ए. आर. काळे यांनी शिक्षण संचालकांचे पत्र न्यायालयात सादर केले. यामध्ये त्यांनी तांत्रिक चुकीमुळे ही नावे सुटली असल्याचे मान्य केले, तसेच संबंधित महाविद्यालयांची नावे आता पोर्टलवर समाविष्ट करण्यात आली असल्याची माहिती कोर्टाला दिली.

### उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निर्देश

विद्यार्थ्यांना जागरूक करा : संबंधित महाविद्यालयांची नावे आता प्रवेशासाठी उपलब्ध आहेत, याची माहिती अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी.

प्रवेशाची मुदत वाढवा : २५ मे ही पहिल्या फेरीचे पर्याय निवडण्याची अंतिम तारीख असल्याने, विद्यार्थ्यांना नवीन पर्याय निवडता यावेत यासाठी प्रवेशाची मुदत योग्य कालावधीसाठी वाढवण्यात यावी.याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील आर. एस. देशमुख आणि एड. ए. आर. जोशी यांनी, तर शासनाच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील ए. आर. काळे यांनी काम पाहिले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे प्रवेशापासून वंचित राहण्याची भीती असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# धर्मयुक्त कर्मानेच सापडतो मुक्तीचा मार्ग: महास्वामीजींच्या उपस्थितीत इष्टलिंग महापूजा आणि दांपत्य पूजा

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर धर्मयुक्त कर्म आणि मानवधर्माचा अंगीकार केल्यानेच मानवाला मुक्तीचा मार्ग सापडतो, असे प्रतिपादन श्री काशीपीठाचे जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले. लातूर येथील एका विशेष सोहळ्यात ते बोलत होते. शहरातील विशाल नगर परिसरातील श्री काशी विश्वेश्वर मंदिर आणि श्री जगद्गुरू विश्वाराध्य जनकल्याण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने अधिक मासाचे (पुरुषोत्तम मास) औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाची भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. तसेच, जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य आणि नूतन जगद्गुरू डॉ. मल्लीकार्जुन शिवाचार्य महाराज यांची शहरातून थाटात रथ मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्यात महास्वामीजींच्या उपस्थितीत इष्टलिंग महापूजा आणि दांपत्य पूजा पार पडली. त्यानंतर दोन्ही जगद्गुरूंच्या हस्ते 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी आशीर्वचन देताना डॉ. चंद्रशेखर महास्वामीजी म्हणाले, इष्ट प्राप्ती करून देणारे दैवत म्हणजे इष्टलिंग होय. वीरशैव धर्मात जन्मापासून मृत्यूपर्यंत इष्टलिंग धारण केले जाते. यात स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान अधिकार असून, उपासकांना कोणताही विटाळ लागू होत नाही. त्यामुळे शिवभक्तांनी इष्टलिंग पूजेत कधीही खंड पडू देऊ नये. कार्यक्रमाला डॉ. शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज, सदाशिव शिवाचार्य वेळापूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यशस्वितेसाठी काशी विश्वेश्वर मंदिराचे कार्यवाह प्रा. मन्मथ पंचाक्षरी, विश्वस्त बसवंतप्पा भरडे, ड. गंगाधरप्पा हामणे, बाबुराव वडगावे, भालचंद्र मानकरी यांच्यासह सोहम महिला भजनी मंडळ व विविध मंडळांनी परिश्रम घेतले. यावेळी हजारो शिवभक्त उपस्थित होते. मार्ग ग्रंथाचे प्रकाशन लातुरात आयोजित या भव्य सोहळ्यात जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य आणि नूतन जगद्गुरू डॉ. मल्लीकार्जुन शिवाचार्य यांच्या हस्ते 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.




Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६